सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ०७ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १४३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

पनवेलमध्ये दहीहंडी उत्सवाला गालबोट; विजेचा धक्का बसून 7 जण जखमी

पनवेल : दहीहंडी उत्सवाच्या जल्लोषाला पनवेलमध्ये गालबोट लागले. शहरातील लाईन आळी परिसरात दहीहंडी उत्सवादरम्यान विजेचा प्रवाह उतरल्याने सात जणांना विजेचा धक्का बसल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी घडली. जखमींमध्ये एका सात वर्षीय चिमुकलीचाही समावेश आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ खळबळ उडाली. पनवेल शहरातील शिवसेना शाखेजवळील नवनाथ पंथीय आस्थानात पारंपरिक पद्धतीने दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. या ठिकाणी गेल्या अनेक वर्षांपासून मानवी मनोरा न रचता सुमारे सहा ते सात फूट उंचीवर दहीहंडी फोडण्याची परंपरा असल्याचे वृत्त आहे. यंदाही मोठ्या उत्साहात हा उत्सव पार पडत असताना अचानक काही जणांना विजेचा धक्का बसला. या घटनेत एकूण सात जण जखमी झाले. त्यामध्ये एका सात वर्षीय मुलीचाही समावेश आहे. विजेचा धक्का बसल्यानंतर जखमींना तातडीने उपचारासाठी वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले. काही जखमींवर प्राथमिक उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले असून, काहींवर उपचार सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत विद्युत पुरवठा खंडित केला. यामुळे पुढील धोका टाळण्यात आला.

दिल्लीमध्ये इमारत कोसळली; एकाचा मृत्यू, अनेक जण अडकल्याची भीती

नवी दिल्ली : दिल्लीतील सत्य निकेतन परिसरात रविवारी एक बहुमजली इमारत अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या इमारतीत विद्यार्थी आणि पीजीमध्ये राहणारे नागरिक असल्याची प्राथमिक माहिती असून, अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला असून, किमान तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दक्षिण-पश्चिम दिल्लीतील मोतीबागजवळील सत्य निकेतन परिसरात, शिव मंदिराजवळ ही घटना घडली. दुपारच्या सुमारास अचानक इमारतीचा मोठा भाग कोसळला आणि काही क्षणांतच परिसरात मलब्याचा ढिगारा झाला. घटनेची माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन दल, पोलीस आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली.

प्राथमिक माहितीनुसार, इमारतीत मोठ्या संख्येने विद्यार्थी राहत होते. काही स्थानिकांनी सुमारे ४० ते ५० विद्यार्थी इमारतीत असण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे ढिगाऱ्याखाली नेमके किती जण अडकले आहेत, याचा शोध घेण्यासाठी बचाव पथकांकडून युद्धपातळीवर काम सुरू आहे. मात्र, अडकलेल्या व्यक्तींची अंतिम संख्या अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झालेली नाही. या दुर्घटनेनंतर NDRF, दिल्ली अग्निशमन दल, दिल्ली पोलीस, दिल्ली आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, MCD, CATS आणि Civil Defence यांच्या पथकांनी संयुक्तपणे बचावकार्य सुरू केले आहे. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात मलबा असल्याने बचाव पथकांकडून काळजीपूर्वक तो हटवण्यात येत आहे. ढिगाऱ्याखाली कोणी अडकले आहे का, हे तपासण्यासाठी बचाव पथके सातत्याने प्रयत्न करत आहेत.

दरम्यान, या दुर्घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून शेजारील इमारतही रिकामी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. इमारत कोसळण्यामागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, प्राथमिक माहितीनुसार इमारतीत बेसमेंटचे काम सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. हे बांधकाम आणि इमारत कोसळण्याचा काही संबंध आहे का, याचा तपास केला जात आहे. त्यामुळे पावसामुळेच इमारत कोसळली, असे सध्या निश्चितपणे म्हणता येणार नाही. या घटनेबाबत NSUIकडूनही प्रतिक्रिया देण्यात आली असून, मोठ्या संख्येने विद्यार्थी ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता व्यक्त करत बचावकार्य वेगाने करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र, विद्यार्थ्यांची नेमकी संख्या आणि मृत-जखमींचा अंतिम आकडा बचावकार्य पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, एकाचा मृत्यू आणि तीन जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली असली तरी बचावकार्य अद्याप सुरू आहे. त्यामुळे पुढील काही तासांत या दुर्घटनेबाबत आणखी महत्त्वाचे अपडेट समोर येण्याची शक्यता आहे.

गणेशमूर्ती शाडू मातीची, नैसर्गिक व पर्यावरणपूरक असावी

विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामच्या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : मातीपासून श्रीगणेशाची मूर्ती तयार करून तिची पूजा करणे आणि उत्सवानंतर ती पुन्हा जलात विसर्जित करणे, यात पंचमहाभूतांपासून निर्माण झालेले शरीर पुन्हा पंचमहाभूतांत विलीन होण्याचा सुंदर आध्यात्मिक संदेश आहे. त्यामुळे गणेशमूर्ती शाडू मातीची, नैसर्गिक व पर्यावरणपूरक असावी. मूर्ती एकदंत, चतुर्भुज, लंबोदर आणि सुपासारखे कान असलेली असावी, असे प्रतिपादन श्रीकृष्ण गुरुकुल वेद पाठशाळेचे प्रधानाचार्य वेदमूर्ती अनिरुद्ध देशमुख यांनी केले.

विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम, चिकलठाणा भाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने गणेशनगर हाऊसिंग सोसायटी, सिडको येथील श्री गणपती मंदिरात रविवारी (दि. ६ सप्टेंबर) 'घरगुती गणेश स्थापना, प्राणप्रतिष्ठा व पूजा' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वेदमूर्ती अनिरुद्ध देशमुख मार्गदर्शन करत होते.

यावेळी व्यासपीठावर श्री गणेश मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष कैलास जंजाळ, विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत उपाध्यक्ष कुंदाताई अंदुरे, श्री गोपाळराव पाठक काका तसेच मंदिर आयाम चिकलठाणा भाग प्रमुख शिवाजीराव दहिवाळ उपस्थित होते.

वेदमूर्ती देशमुख यांनी सांगितले की, घरगुती पूजेसाठी मोठ्या आकाराची मूर्ती आवश्यक नसून लहान, सात्त्विक व सुबक मूर्ती अधिक योग्य आहे. डावीकडे वळलेली सोंड असलेली मूर्ती घरगुती पूजेत सामान्यतः प्रचलित आहे. मात्र मूर्तीच्या आकारापेक्षा शास्त्रोक्त पद्धतीने केलेली पूजा, श्रद्धा आणि भक्तिभाव अधिक महत्त्वाचा आहे. त्यांनी गणेशमूर्तीचे स्वरूप, स्थापना, प्राणप्रतिष्ठा व पूजाविधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विषयाच्या मांडणीनंतर त्यांनी उपस्थितांच्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली. कार्यशाळेचे प्रास्ताविक मंदिर आयामाच्या देवगिरी प्रांत महिला सहप्रमुख अनुराधा पुराणिक यांनी केले. सूत्रसंचालन चिकलठाणा भाग प्रमुख शिवाजीराव दहिवाळ यांनी, तर आभार प्रदर्शन मंदिर आयामाच्या प्रांत महिला प्रमुख राजश्री भिते यांनी केले.

कार्यशाळेला माधुरीताई अदवंत, तृप्ती हरसूलकर, अरुणराव जाधव, शुभम पठाडे, वेदमूर्ती मंदार पाठक, रोहित स्वामी, राजेंद्र पाथरीकर, दिलीप राऊत, राधेश्याम पांडे, गिरीधर पांडे यांच्यासह भाविकांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

राजस्थान महापालिका निवडणुकीत चंद्रशेखर बावनकुळे यांचा झंझावात

10 शहरांमध्ये भाजपच्या प्रचाराची सांभाळली धुरा

राजस्थान : महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राजस्थानमधील महानगरपालिका निवडणुकीत पक्षाच्या प्रचारात आणि व्यवस्थापनात मोठी कामगिरी बजावली आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी त्यांची राजस्थान महानगरपालिका निवडणुकीसाठी सहप्रभारी म्हणून नियुक्ती केली होती. गेल्या 15 दिवसांपासून ते राजस्थानमधील 10 महानगरपालिकांच्या निवडणूक व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळत असून प्रचारात सक्रिय सहभागी झाले आहेत.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी जयपूर, कोटा, भरतपूर, जोधपूर, उदयपूर, अजमेर, पाली, बिकानेर, भिलवाडा आणि अलवर या महानगरपालिका क्षेत्रांचे दौरे केले. या काळात त्यांनी कार्यकर्ते संमेलने, बैठका, पदयात्रा आणि गृहभेटींच्या माध्यमातून संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यावर भर दिला. त्यांच्यासोबत महाराष्ट्रातील भाजपा आमदार आणि प्रमुख पदाधिकारीही या विजयी रणनीतीत सहभागी झाले आहेत. प्रचारादरम्यान त्यांनी राजस्थानमध्ये राहणाऱ्या महाराष्ट्रीयन नागरिकांशी, व्यावसायिक, शैक्षणिक क्षेत्रातील प्रमुख व्यक्ती आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. निवडणुकीच्या रणनीतीसाठी ते राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय मंत्री आणि स्थानिक नेत्यांसोबत सतत समन्वय साधत आहेत. या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे भाजपाला निवडणुकीत मोठे यश मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

नेपाळ - तिबेट बॉर्डरवरील पूरग्रस्त भागात प्राण गमावलेल्या सर्वांना केसरी टूर्सतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली !

नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांनी "पूरग्रस्त तिबेट बॉर्डर परिसर सोडून उरलेला संपूर्ण नेपाळ सुरक्षित असून" तिथे पर्यटनासाठी येण्याचे आवाहन केले आहे.
या आवाहनानुसार केसरीच्या सप्टेंबरपासूनच्या सर्व नेपाळ टूर्स सुरू राहतील. या टूर्सच्या कॉस्टमधील काही रक्कम केसरीतर्फे नेपाळ पूरग्रस्त मदत निधीसाठी देण्यात येईल. याबद्दल पर्यटकांचे शतश: आभार !

नेपाळमधील पर्यटन आणि प्रमुख पर्यटनस्थळे सुरू आहेत.
हिमालयाचे भव्य दर्शन, काठमांडूची संस्कृती, पोखराचे निसर्गसौंदर्य, चितवनचे जंगल आणि नेपाळची आपुलकी. चला, नेपाळला भेट देऊया – सुरक्षितपणे, संवेदनशीलतेने आणि विश्वासाने.

ईझी व्हिसा टूर्स starts ₹83,000*
- नेपाळ
- भूतान
- थायलँड
- फु क्रॉक बँकॉक छोटा ब्रेक
- बेस्ट ऑफ बाकू
- मॉरिशस
- श्रीलंका रामायण ट्रेल
- श्रीलंका याला नॅशनल पार्क
- फिलिपिन्स पालावान
- चियांग माई लँटर्न फेस्टिव्हल फुकेत क्राबी बँकॉक
- अझरबैजान जॉर्जिया

साऊथ ईस्ट एशिया टूर्स starts ₹95,000*
- बाली छोटा ब्रेक
- सिंगापूर छोटा ब्रेक
- लंगकावी छोटा ब्रेक
- हाँगकाँग शेन्झेन मकाओ
- लेगोलँड सिंगापूर मलेशिया
- बाली गिली आयलँड नुसा पेनिडा
- सिंगापूर मलेशिया गेंटिंग ड्रीम क्रूझ
- व्हिएतनाम फु क्रॉक
- सिंगापूर थायलँड मलेशिया
- व्हिएतनाम कंबोडिया

इंटरनॅशनल टूर्स starts ₹2,07,000*
- बेस्ट ऑफ जपान
- इसेन्शिअल युरोप
- मोरोक्को जॉर्डन
- ताश्कंद समरकंद बुखारा अल्माटी
- साऊथ कोरिया
- स्कँडिनेव्हिया
- स्प्लेंडिड चायना
- युएसए ईस्ट अँड वेस्ट कोस्ट विथ शिकागो
- साऊथ आफ्रिका केनिया विथ व्हिक्टोरिया फॉल्स
- ऑस्ट्रेलिया न्यूझीलँड

छोटा ब्रेक टूर्स starts ₹38,000*
- इंदूर उज्जैन मांडू
- अमृतसर
- पुरी भुवनेश्वर चिलिका
- अयोध्या प्रयागराज वाराणसी
- पुद्दुचेरी महाबलीपुरम
- मैसूर ऊटी
- मुन्नार अलेप्पी
- गुजरात रण उत्सव
- हंपी बदामी
- स्टॅच्यू ऑफ युनिटी नडाबेट अहमदाबाद

भारतीय टूर्स starts ₹41,000*
- शिमला मनाली
- भाऊबीज फॅमिली स्पेशल क्रूझ टूर सोनाली कुलकर्णीसोबत
- काश्मीर वैष्णोदेवी
- राजस्थान मारवाड
- दार्जिलिंग गंगटोक
- डलहौसी धरमशाला अमृतसर
- केरळ कन्याकुमारी
- ऑल ऑफ मेघालय
- मिस्टीकल नॉर्थ ईस्ट
- संपूर्ण मध्य प्रदेश

मारीगोल्ड यात्रा starts ₹42,000*
- नेपाळ मुक्तिनाथ
- गिरनार सोमनाथ
- कृष्णलीला
- मदुराई रामेश्वरम कन्याकुमारी
- पीठापूरम कुरवपूर श्रीशैलम
- जगन्नाथ पुरी कोलकाता गंगासागर
- साऊथ इंडिया टेंपल टूर
- त्रिस्थळ दर्शन अयोध्या
- सौराष्ट्र स्टॅच्यू ऑफ युनिटी
- इंडियन रामायण ट्रेल जनकपूर

ऑफर्स* मॉन्सून ऑफर* सप्टेंबरपर्यंतच्या टूर्सवर 5,000 पर्यंत ॲडिशनल डिस्काऊंट | ॲडव्हान्स बुकिंग डिस्काऊंट* 50,000 पर्यंत | फुल पेमेंट डिस्काऊंट* टूरच्या 90 दिवस आधी | एक्स गेस्ट डिस्काऊंट* | 8+ ग्रुप डिस्काऊंट* | लास्ट मिनीट डिल्स* | 0% EMI*

*T & C Apply

9167 835 071 | 1800 266 1100
सोमवार ते शनिवार सकाळी 9:30 ते संध्याकाळी 7

मुंबई 022-61744100, विलेपार्ले 7045 23 4545, बोरीवली 022 69582200, वसई 7045 00 0031 | ठाणे 022-69721100, डोंबिवली 7045 00 0041, वाशी 022-69462222, नाशिक 0253-6914444 | पुणे 020-66465555, बाणेर 020-69101234, नागपूर 0712-6921717, कोल्हापूर 0231-2533222 | छत्रपती संभाजीनगर, चेतना नगर 9822 26 7567, सिडको 9960 08 2472, परभणी 9422 17 6466, अंबाजोगाई 7972 15 1225

KESARI.in

केसरीच्या स्पेशॅलिटी टूर्स | CORPORATE TOURS 70300 11444, 914556 1122 | CUSTOMIZED HOLIDAYS 1800 266 9080, 86577 58850 | Foreign EXchange | Shop travel-curated products. www.shop.kesari.in

श्री कंकालेश्वर महादेव मंदिर परिसरात शिवपुराण महाकथा महाराजांचे स्वागत करताना नवनाथ शिराळे पाटील बीड

उमेद अभियानाच्या केज तालुका ग्रामसखींचे विविध मागण्यांसाठी निवेदन

केज दि ५(प्रतिनिधी) : उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटना केज तालुका ग्राम सखींच्या वतीने केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कार्यालयास विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

निवेदनात पुढील पंधरा दिवस किंवा शासन निर्णय वेळेपर्यंत ऑनलाईन काम बंद करत केल्या असून मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदन देण्यास पन्नास हून अधिक ग्राम सखींची उपस्थिती होती यावेळी निवेदनावर स्वाक्षरी करून तात्काळ मागण्या मान्य करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे ग्रामसखींना अपंगत्व मृत्युमुखी दहा लाख विमा सानुग्रह अनुदान त्वरित मंजूर करावे, ऑनलाइन कामासाठी चांगले टॅब व अतिरिक्त मानधन मासिक 20 रुपये त्रीमासिक 50 रुपये द्यावे. वाढीव मानधन एप्रिल जुलै 2026 चे मानधन तात्काळ अदा करावे. उमेद कक्षा ग्रामविकास विभागाचा कायमस्वरूपी दर्जा द्यावा

मासिक मानधन वाढ 15000/ प्रभाग संघ केडर 24000 द्यावे. मासिक ग्रेडेशन प्रवास भत्ता व अतिरिक्त कामाचे मानधन द्यावे. विनंती बदल्या- IJP शिक्षण शुल्क: प्रवास/दैनिकभत्ता वाढ FTA - PFGratuity, Mediclaim 10% वेतन वाढ एक महिन्यात लागू करावा. C SC कर्मचाऱ्याचे उमेद समायोजन व समान काम तसेच समान वेतन लागू करावा. मानधन ग्राम सखीं च्या खात्यात थेट वर्ग करावे.वाढीव मानधन ,दरमहा वैयक्तिक खात्यावर वर्ग करण्यात यावे आदि मागण्याबाबत शासनाकडून लेखी आदेश मिळत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील त्यासाठी सर्व ग्राम सखी काम बंद ठेवून शासनाकडे वारंवार पाठपुरावा करत राहतील असे निवेदनातून मागणी करण्यात आलेली आहे.

मुलीच्या शिक्षणासाठी धावणाऱ्या रमाबाई रणवीर यांच्या जिद्दीला रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचा मदतीचा हात..!

17 हजार 500 रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द ; सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमाचे कौतुक

अंबाजोगाई : प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मुलीच्या शिक्षणासाठी धावण्याच्या स्पर्धेत सहभागी होऊन प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या रमाबाई रणवीर यांच्या जिद्द आणि संघर्षाची दखल घेत रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईने आर्थिक मदतीचा हात पुढे केला आहे. क्लबच्या वतीने लोकवाट्यातून संकलित करण्यात आलेली १७ हजार ५०० रूपयांची आर्थिक मदत रमाबाई रणवीर यांच्याकडे नुकतीच सुपूर्द करण्यात आली.

रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. गरजू विद्यार्थी व रूग्णांना मदत, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे, व्याख्याने, प्रबोधन तसेच जनजागृतीपर उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जपली जाते. याच भावनेतून रमाबाई यांच्या संघर्षाची दखल घेत क्लबने त्यांना आर्थिक सहाय्य करण्याचा निर्णय घेतला. रमाबाई रणवीर या आपल्या मुलीच्या शिक्षणासाठी प्रतिकूल परिस्थितीत कष्ट करीत आहेत. उदरनिर्वाहासाठी त्या ज्ञानदीप अकॅडमी येथे स्वयंपाकाचे काम करतात. आपल्या मुलीचे शिक्षण थांबू नये, यासाठी त्यांनी धावण्याच्या स्पर्धेत सहभाग घेतला आणि प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या या जिद्दीची आणि मातृत्वाच्या संघर्षाची माहिती मिळाल्यानंतर रोटरी क्लबने मदतीसाठी पुढाकार घेतला. ज्ञानदीप अकॅडमी येथे आयोजित छोटेखानी कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष भीमाशंकर शिंदे, सचिव सुनील व्यवहारे तसेच रोटरीयन आनंद कर्नावट, जगदीश जाजू, भागवतराव कांबळे, शरद देडे, कृष्णा चव्हाण, वाजेद काझी, डी.एच.थोरात, श्रीनिवास पवार, कृष्णा चव्हाण, जगदीश जाजू, नरहरी तपकिरे, भागवत कांबळे आदींनी लोकवाट्याच्या माध्यमातून योगदान दिले. रमाबाई रणवीर यांच्या जिद्दीचा आणि मुलीच्या शिक्षणासाठी त्या करीत असलेल्या संघर्षाचा सन्मान करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था आणि संघटनांनी रमाबाई यांना शक्य तेवढे सहकार्य करावे, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष भीमाशंकर शिंदे व सचिव सुनील व्यवहारे यांनी केले. रमाबाई रणवीर यांच्या संघर्षाला मिळालेली ही मदत केवळ आर्थिक स्वरूपाची नसून, जिद्दीला समाजाची साथ मिळाली तर स्वप्नांना नक्कीच बळ मिळते, याचा प्रेरणादायी संदेश देणारी ठरली आहे.

मराठवाड्यावर दुष्काळाचे काळे ढग; आता आभाळाकडे नव्हे, तंत्रज्ञानाकडे पाहण्याची वेळ!

ढग दिसताच कृत्रिम पावसाचा प्रयोग राबवा; शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने तातडीने निर्णय घ्यावा — तुळशीराम पवार

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्याने शेतीसमोर गंभीर संकट उभे राहिले असून, अनेक भागांतील पिके पाण्याअभावी माना टाकू लागली आहेत. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या बळीराजाच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे. या पार्श्वभूमीवर आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेत मराठवाड्यात कृत्रिम पावसाचा प्रयोग तातडीने राबवावा, अशी जोरदार मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार यांनी केली आहे.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना लवकरच निवेदन देणार असल्याची माहिती पवार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिली आहे.

पावसाने पाठ फिरवल्याने मराठवाड्यातील शेतकरी संकटाच्या छायेत आहे. पिकांना पाण्याची नितांत गरज असताना आभाळाकडे डोळे लावून बसण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून ढगाळ वातावरण निर्माण झालेल्या भागात कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्याची शक्यता तपासणे गरजेचे आहे, असे पवार यांनी म्हटले आहे.

कृत्रिम पावसाचा प्रयोग शंभर टक्के यशस्वी होईलच, याची हमी देता येत नसली तरी संकटाच्या काळात सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, हा विश्वास निर्माण करण्यासाठी सरकारने सर्व पर्यायांचा गांभीर्याने विचार करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मराठवाड्यातील शेती वाचविण्यासाठी आता पारंपरिक उपायांबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याची गरज आहे. पावसाळ्याच्या उर्वरित काळात ज्या ठिकाणी योग्य ढगांची स्थिती निर्माण होईल, तेथे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कृत्रिम पावसाचा प्रयोग युद्धपातळीवर राबविल्यास पिकांना काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो आणि शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान टाळण्यास मदत होऊ शकते.

स्व. केशवराव नाळवंडीकर गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

केज प्रतिनिधी: दि. ६ सप्टेंबर- आजच्या आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात मानवी मूल्ये मागे पडत चालली आहेत. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, दयाळूपणा, आदर, कृतज्ञता आणि सहानुभूती यांसारख्या मूल्यांचे धडे देणे आवश्यक आहे, जेणेकरून ते समाजात वावरताना जबाबदारीने वागतील. विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण देणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. केवळ पुस्तकी ज्ञान किंवा तांत्रिक कौशल्ये मिळवून माणूस हुशार बनू शकतो, पण एक चांगला आणि संवेदनशील माणूस बनण्यासाठी संस्कारांची अत्यंत आवश्यकता असते. केवळ गुणांच्या मागे धावल्यामुळे आणि नैतिक शिक्षणाचा अभाव असल्यामुळे आजकाल तरुण पिढीमध्ये असंवेदनशीलता वाढताना दिसत आहे. बऱ्याचदा विद्यार्थ्यांमधील संस्कारांच्या कमतरतेमुळे ते चुकीच्या मार्गाला किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळण्याची शक्यता असते. संस्कारक्षम शिक्षण अशा प्रवृत्तींना आळा घालण्याचे काम करते. असे प्रतिपादन अंबाजोगाई येथील प्रा. डॉ. शांतिनाथ बनसोडे यांनी केले.

समाजातील सर्वात विश्वासू घटक म्हणजे शिक्षक : गंमत भंडारी

बीड : समाजातील सर्वात विश्वासू घटक म्हणजे शिक्षक हाच महत्वाचा असतो असे प्रतिपादन संपादक गंमत भंडारी यांनी केले. बीडमध्ये रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रशिल्पकार पुरस्कार (नेशन बिल्डर अवॉर्ड) सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. यावेळी जिल्हा परिषद माध्यमिक उप शिक्षणाधिकारी धनंजय शिंदे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

रोटरी क्लब कोणाच्याही शिफारसी ने शिक्षकांना पुरस्कार देत नाही याबाबत समाधान व्यक्त केले शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ९ शिक्षकांचा उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या कार्याची दखल घेत रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने आयोजित करण्यात आलेला राष्ट्रशिल्पकार पुरस्कार ('रोटरी नेशन बिल्डर अवॉर्ड) २०२६' वितरण सोहळा शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी नगर रोडवरील हॉटेल नीलकमल येथे पार पडला.

शिंदे यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करताना शिक्षकांनी शिक्षणा सोबत विद्यार्थी खेळात सुद्धा प्राविण्य कसे मिळवेल या कडेही लक्ष द्यावे असे आवाहन केले. शिक्षण क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या ९ शिक्षकांचा या वेळी 'नेशन बिल्डर अवॉर्ड २०२६' प्रदान करून गौरव करण्यात आला. हे सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांची निवड त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यां मधून करण्यात आली होती. पुरस्कारप्राप्त शिक्षकांमध्ये शोभा सुरेश दळवी, शैलजा नितीन ठाकूर, विजय लोभाजी डोंगरे, किरण दत्तू गायकवाड, दादासाहेब तारामती शामराव गवते, वसुदेव सखाराम काजळे, तुकाराम रामकिसन माळकर, दत्तात्रय रावसाहेब नीलकंठ आणि मनोज दशरथ कवडे यांचा समावेश होता.

कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ बीडचे अध्यक्ष सीए श्रीगोपाल लड्ढा, सचिव सुहास बेदरे, प्रकल्प समन्वयक परमेश्वर जाधव, प्रकल्प प्रमुख प्रा. सुनील खंडागळे आणि प्रा. सुनील जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करून समाजनिर्मितीत त्यांच्या योगदानाची दखल घेण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. शिक्षकांचे योगदान समाजनिर्मितीसाठी महत्त्वाचे विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत संस्कार आणि योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक करीत असतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने नेशन बिल्डर अवॉर्ड प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास उमापूरकर आणि अनिल जोशी यांनी केले तर राष्ट्रगीताने सोहळ्याची सांगता झाली.

कष्टाचे चीज! गाढे पिंपळगावच्या नंदिनी सोनवणे हिची एमबीबीएसला निवड

परळी वैजनाथ: सर्वसामान्य कुटुंबातील परिस्थितीवर मात करत, जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर गाढे पिंपळगाव येथील नंदिनी लक्ष्मण सोनवणे हिने एमबीबीएस वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविला आहे. मुलीच्या शिक्षणासाठी पुण्यात जाऊन मिळेल ते काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या वडिलांच्या कष्टाचे चीज करत नंदिनीने मिळविलेले हे यश परिसरासाठी अभिमानाची बाब ठरले आहे.

तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथील रहिवासी असलेले लक्ष्मण मधुकर सोनवणे हे रोजगाराच्या शोधात पुणे येथे गेले. परिस्थिती प्रतिकूल असतानाही त्यांनी मिळेल ते काम स्वीकारून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. आपल्या मुलीने मोठे शिक्षण घ्यावे, हे स्वप्न उराशी बाळगत त्यांनी नंदिनीच्या शिक्षणासाठी सातत्याने मेहनत घेतली. आर्थिक परिस्थितीची कोणतीही सबब न करता त्यांनी मुलीच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. नंदिनी सोनवणे हिने आपल्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात अंबाजोगाई येथील वेंकटेश विद्यालयातून केली. तेथे तिने पहिली ते सहावीपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर पुणे महानगरपालिकेच्या (PMC) शाळेत सातवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. दहावीच्या परीक्षेत तिने ९७ टक्के गुण मिळवत आपल्या शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे पुढील शिक्षणासाठीचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला.

यानंतर नंदिनीने पुणे येथील व्हरसेटाईल ज्युनिअर कॉलेज पुणे येथून अकरावी व बारावीचे शिक्षण पूर्ण केले. वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे ध्येय मनाशी बाळगून तिने अभ्यासात सातत्य ठेवले. अखेर तिच्या मेहनतीला यश मिळाले आणि एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी तिला प्रवेश मिळाला. नंदिनीचे हे यश केवळ तिच्या शैक्षणिक गुणवत्तेचे प्रतीक नसून,मुलीच्या शिक्षणासाठी वडिलांनी घेतलेल्या अथक परिश्रमांची पावती मानली जात आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द, मेहनत आणि पालकांचे पाठबळ असेल तर यश निश्चित मिळते, याचा आदर्श नंदिनीने निर्माण केला आहे.

धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या (एसटी) आरक्षण अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन देणार

बीड (प्रतिनिधी) : धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न अनेक दशकांपासून प्रलंबित आहे. समाजाने आपल्या घटनात्मक हक्कांसाठी सातत्याने लोकशाही व संविधानिक मार्गाने संघर्ष केला आहे. हा प्रश्न धनगर समाजाच्या सामाजिक न्याय, शैक्षणिक व आर्थिक प्रगती तसेच भावी पिढ्यांच्या राजकीय भवितव्याशी निगडित आहे. आता शासनाने धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या (एस.टी.) आरक्षणाची अंमलबजावणी करावी. शासनाने या विषयावर वेळोवेळी सकारात्मक भूमिका व्यक्त केली असली, तरी आता केवळ आश्वासनांपेक्षा तात्काळ पाऊले उचलणे आवश्यक असून त्यासाठी आज दि.7 सप्टेंबर रोजी आमदार गोपीचंद पडळकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे. यासाठी धनगर समाज बांधवांनी मोठ्या संख्येने डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन या ठिकाणी एकत्र यावे असे आवाहन सकल धनगर समाजाच्यावतीने मिनाक्षीताई देवकते-डोमाळे यांनी केले आहे.

सध्या धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या (एस.टी.) आरक्षणाच्या अंमलबजावणी संदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी अत्यंत निर्णायक टप्प्यावर आली आहे. दिनांक 8 सप्टेंबर पर्यंत राज्य सरकारने आपली ठाम भूमिका न्यायालया समोर मांडावी, ही समाजासाठी अत्यंत महत्त्वाची संधी आहे. या पार्श्वभूमीवर खालील मुद्यांवर शासनाने तातडीने लक्ष घालावे.

सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट व ठाम भूमिका राज्य सरकारने कोणतीही संदिग्ध भूमिका न घेता, धनगर समाजाच्या हक्काच्या आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, अशी ठाम आणि स्पष्ट बाजू पूर्ण कायदेशीर ताकदीने सर्वोच्च न्यायालयात मांडावी, जेणेकरून हा प्रश्न कायमचा मार्गी लागेल. पर्यायी 'प्लॅन-बी' - सुप्रीम कोर्टाचा निकाल आपल्या बाजूने लागेल ही अपेक्षा आहेच; मात्र निकाल प्रतिकूल ठरल्यास धनगर समाजाच्या आरक्षणाची अंमलबजावणी पर्यायी पद्धतीने कशी करता येईल, यासाठी सरकारने आत्तापासूनच एक ठोस 'प्लॅन-बी' तयार ठेवावा.

आपेगावात शस्त्रांचा धाक दाखवून शेतातील मौल्यवान झाडे तोडून चोरली; 40 जणांवर गुन्हा

अंबाजोगाई : अंबाजोगाई न्यायालयात मालकी सिध्द झालेल्या शेतात बेकायदेशीररीत्या शिरून शस्त्रांचा धाक दाखवत चंदनासह मौल्यवान झाडे तोडून चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी ११ नामजद आरोपींसह ३० ते ४० अनोळखी लोकांविरुद्ध दरोडा, बेकायदेशीर जमाव, खंडणी व चोरीसह विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सुनील पांडुरंग तट (वय ४८ वर्षे, व्यवसाय शेती, रा. आपेगाव, ता. अंबाजोगाई) यांच्या मालकीच्या गट क्रमांक ७३ मधील शेतजमिनीबाबत दिवाणी न्यायालय ते उच्च न्यायालयापर्यंत निकाल त्यांच्या बाजूने लागलेला आहे. असे असतानाही आरोपी श्रीराम अप्पाराव शिंदे, अशोक श्रीराम शिंदे, वेदांत अशोक शिंदे (सर्व रा. आपेगाव), नामदेव पंढरीनाथ शेरकर, भगवान महादेव शिंदे, रामराव पंढरीनाथ शेरकर (सर्व रा. कान्नापूर मोहा, ता. परळी), सादीक हुसेन शेख, फिरोज शेख, जमीर शेख (सर्व रा. गुरुवार पेठ, अंबाजोगाई), शहनवाज पाशा कुरेशी (रा. रांजणी, ता. कळंब) आणि प्रमोद शितोळे (रा. कोनी, ता. कळंब) तसेच इतर ३० ते ४० जणांनी बेकायदेशीर जमाव जमवला.

आरोपींनी हातात कोयता, कुऱ्हाड, बंदूक यांसारखी घातक शस्त्रे घेऊन शेतात घुसखोरी केली. त्यांनी फिर्यादीस ठार मारण्याची धमकी देऊन दहशत माजवली आणि जेसीबी व लाकूड कापण्याच्या यंत्रांच्या साहाय्याने चंदनाची, बाभळीची, खैराची, लिंबाची अशी सुमारे २५ लाख रुपये किमतीची मौल्यवान झाडे तोडून नष्ट केली. तोडलेली लाकडे पिकअप,ट्रॅक्टर आणि ट्रकच्या साहाय्याने चोरून नेण्यात आली.

या प्रकरणी युसूफ वडगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १८९, १८९(२), १९१(२), १९१(३), ३(५), ३०३(२), ३०८, ३०९(४), ३२४(४), ३२६(इ), ३२९(३), ३५१(२), ३५१(३) आणि ६१ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भीमराव मांढरे करीत आहेत.

बीडच्या राजाच्या दरबारात यंदा 'आदियोगी'चा भव्य आविष्कार!

बीड : गणेशोत्सवातील भव्य देखावे आणि देशातील प्रसिद्ध धार्मिक स्थळांच्या अप्रतिम प्रतिकृतींसाठी ख्यातनाम असलेल्या 'बीडचा राजा न्यू गणेश मित्र मंडळा'ने यंदा आपल्या ७२व्या वर्षात पदार्पण करताना भव्यतेचा नवा अध्याय सुरू केला आहे. मंडळाच्या दरबारात यंदा कोयंबतूर येथील प्रसिद्ध आदियोगीच्या संकल्पनेवर आधारित तब्बल २८ फूट उंच भव्य मूर्ती साकारण्यात आली असून, ती गणेशभक्त आणि भाविकांसाठी यंदाच्या उत्सवातील प्रमुख आकर्षण ठरणार आहे. मंडळाने गेल्या अनेक वर्षांपासून बीडकरांना देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांचा प्रत्यक्ष अनुभूती देणारा अनुभव आपल्या देखाव्यांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला आहे. केदारनाथ, अमरनाथ, महावैष्णो देवी, तिरुपती तसेच गेल्या वर्षी साकारलेल्या रामेश्वरम धामाच्या भव्य प्रतिकृतींनी संपूर्ण जिल्ह्यात मंडळाची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

अंबाजोगाई पालिकेकडून RTI कायद्याची पायमल्ली? 5 स्मरणपत्रांनंतरही माहिती न मिळाल्याचा अमन परदेशी यांचा आरोप; SDO आदेश व पुराव्यांसह जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

अंबाजोगाई : अंबाजोगाई नगर परिषदेच्या सर्व्हे क्रमांक १७ येथील भटक्या श्वानांच्या निवारा केंद्रातील कथित गैरप्रकार, मूक प्राण्यांचे संशयास्पद मृत्यू आणि संबंधित संस्थेला देण्यात आलेल्या निधीबाबत माहिती अधिकारातून माहिती मागूनही पालिका प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस युवक आघाडीचे शहर उपाध्यक्ष अमन परदेशी यांनी केला आहे.

परदेशी यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी ७ ऑगस्ट २०२६ पासून तब्बल पाच स्मरणपत्रे पालिकेकडे अधिकृत आवक शिक्क्यांसह सादर केली आहेत. निवारा केंद्रातील मृत प्राण्यांचे पोस्टमार्टम अहवाल, मृत्यू नोंदवही, वाहनांचे लॉगबुक तसेच CCTV फुटेज यासह विविध कागदपत्रांची मागणी करण्यात आली आहे. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित माहिती उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा त्यांचा दावा आहे.

या प्रकरणात महत्त्वाची बाब म्हणजे, पालिका प्रशासनाने संयुक्त चौकशी अहवाल SDO कार्यालयामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविल्याचे लेखी पत्र दिल्याचे परदेशी यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी केलेल्या पाठपुराव्यात उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाने ११ ऑगस्ट २०२६ रोजी आदेश जारी केल्याचे समोर आले आहे. या आदेशात कथित अवैध प्राणी शेल्टर होमची चौकशी करण्यासह पालिकेच्या मुख्य अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश असल्याचा दावा

परदेशी यांनी केला आहे.

दरम्यान, निवारा केंद्रातील मूळ CCTV फुटेज, हार्ड डिस्क व मृत्यू नोंदवही यामध्ये छेडछाड अथवा पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाला असण्याची शक्यता असल्याचा संशयही परदेशी यांनी व्यक्त केला आहे. या आरोपांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

परदेशी यांनी या प्रकरणी ११ ऑगस्ट रोजी अतिरिक्त पोलीस अधीक्षक कार्यालय, अंबाजोगाई येथे तक्रार दाखल केल्याचे सांगितले. तसेच SDO कार्यालयाचा आदेश, पोलीस तक्रार आणि पालिकेला दिलेली पाचही स्मरणपत्रे यांचा पुराव्यांचा संच बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे स्पीड पोस्टद्वारे पाठविण्यात आला असून तो कार्यालयात पोहोचल्याचा दावा त्यांनी केला आहे. याशिवाय या संपूर्ण प्रकरणाची माहिती असलेली PDF संबंधित वरिष्ठ स्तरावर तसेच प्राणी कल्याणाशी संबंधित यंत्रणांकडे पाठविल्याचेही परदेशी यांनी सांगितले.

पालिकेतील संबंधित अधिकारी, कथित गैरप्रकार आणि निधीच्या वापराबाबत निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी अमन परदेशी यांनी केली आहे. तसेच दोषी आढळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करावी, अशीही मागणी त्यांनी केली.

या प्रकरणी प्रशासनाकडून अधिकृत स्पष्टीकरण अथवा संबंधित कागदपत्रे समोर आल्यानंतरच आरोपांची सत्यता स्पष्ट होणार आहे. मात्र, RTI अर्जांवर कारवाई, शेल्टर होममधील प्राण्यांच्या मृत्यूची नोंद आणि संबंधित आर्थिक व्यवहारांची चौकशी या मुद्द्यांमुळे प्रकरणाला गंभीर स्वरूप प्राप्त झाले आहे. "मूक प्राण्यांना न्याय मिळेपर्यंत आणि संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक चौकशी होईपर्यंत पाठपुरावा सुरूच ठेवणार," असा इशारा अमन परदेशी यांनी दिला आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

एच. पी. एल. माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

बिडकीन दि ६ सष्टेबर.: एच. पी. एल. माध्यमिक विद्यालय, कृष्णापूर (बिडकीन) येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती, महान तत्त्वज्ञ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगणारी भाषणे, कविता, गीत तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी विद्यार्थ्यांनी 'शिक्षक म्हणजे ज्ञानाचा दीपस्तंभ' या भावनेतून आपल्या गुरुजनांविषयी आदर व प्रेम व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक संभाजी जाधव आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा मिळते आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, असा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. विद्यालयातील शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना मेहनत, शिस्त, संस्कार आणि सातत्याने ज्ञान मिळविण्याचे महत्त्व पटवून दिले. शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये आपुलकीचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. गुरु-शिष्य नात्याची महती अधोरेखित करणारा हा शिक्षक दिनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात व संस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये 'गोविंदा'च्या जयघोषात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा

बिडकीन, दि. ६ सप्टेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका सविता तोतला तसेच शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिकांच्या हस्ते श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित नृत्य, ओव्या व भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच काही विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाची आकर्षक वेशभूषा परिधान करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या प्रांगणात दहीहंडीचा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने दहीहंडी फोडत आनंद व्यक्त केला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. विजय भोसले यांना 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार'

कन्नड :दि.०६ सप्टेंबर - ग्रामीण उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कन्नडचे प्राचार्य डॉ. विजय नानासाहेब भोसले यांना महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ रोजी पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात झालेल्या कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर आणि कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी उपस्थित होते.

पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि प्रमाणपत्र असे आहे. डॉ. विजय भोसले आणि अश्विनी विजय भोसले यांनी हा पुरस्कार स्वीकारला. शैक्षणिक, प्रशासकीय, पर्यावरणीय आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरावर दखल घेतली आहे. डॉ. भोसले यांनी १९९४ मध्ये रसायनशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून शैक्षणिक कारकिर्दीला सुरुवात केली. २००५ पासून ते छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयात ई-लर्निंग, डिजिटल क्लासरूम, संगणक प्रयोगशाळा आणि करिअर मार्गदर्शन केंद्र यांसारख्या सुविधा विकसित करण्यात आल्या. कला, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम तसेच विद्यार्थी विकासालाही त्यांनी चालना दिली.

त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाला महाराष्ट्र शासनाचा 'जागर जाणीवांचा' महिला सबलीकरण पुरस्कार (२०१४-१५), 'श्री छत्रपती शिवाजी महाराज वनश्री राज्यस्तरीय पुरस्कार' (२०१७-१८) आणि उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्कार (२०२४) मिळाले आहेत. तसेच विद्यापीठाचा 'आदर्श परीक्षा केंद्र पुरस्कार' (२०१४) आणि 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' (२०२६) महाविद्यालयाला प्राप्त झाले आहेत.

शेवगाव आरटीओ कॅम्पमध्ये चालकांचा हिरमोड; अधिकारी-एजंट संगनमताचा आरोप; उच्चस्तरीय चौकशीची मागणी

शेवगाव (प्रतिनिधी) : ग्रामीण भागातील नागरिकांना ड्रायव्हिंग लायसन्ससाठी अहिल्यानगरला जाण्याचा वेळ व आर्थिक खर्च वाचावा, यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने शेवगाव येथे दरमहा आरटीओ कॅम्प आयोजित केला जातो. मात्र, या कॅम्पमध्ये मर्यादित वाहनचालकांच्या चाचण्या घेतल्या जात असल्याने शेकडो अर्जदारांचा हिरमोड होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शेवगाव तालुक्यात सुमारे तीन लाख लोकसंख्या असून १११ महसुली गावे आहेत. मात्र, मासिक आरटीओ कॅम्पमध्ये अवघ्या ९० वाहनचालकांच्या ड्रायव्हिंग टेस्ट घेतल्या जात असल्याने मोठ्या संख्येने अर्जदारांना संधी मिळत नाही. सारथी परिवहन सेवा पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी केलेल्या अर्जदारांची प्राधान्याने चाचणी घेणे अपेक्षित असताना अधिकारी, कर्मचारी व एजंट यांच्या संगनमताने निवडक अर्जदारांना स्लॉट उपलब्ध करून दिले जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, फिटनेस प्रमाणपत्र तसेच रोड टॅक्ससंदर्भातील कामांसाठी एजंटांमार्फत चिरीमिरीची मागणी केली जात असल्याचेही आरोप आहेत. त्यामुळे आरटीओ कार्यालयाच्या कारभारातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या संपूर्ण प्रकाराची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

अहिल्यानगर शहरात वेश्या व्यवसायावर छापा

दोन महिलांची सुटका; 44 वर्षीय महिलेविरुद्ध गुन्हा दाखल

अहिल्यानगर : शहरातील संजीवनी कॉलनी परिसरात घरातून सुरू असलेल्या कथित वेश्या व्यवसायावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून दोन महिलांची सुटका केली. या प्रकरणी झिनत फैय्याजअली महंमद (वय ४४, रा. संजीवनी कॉलनी, पानसरेवाडा, रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर) हिच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील अवैध व्यवसायांविरोधात कारवाई सुरू आहे. प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक कल्पना पवार आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदिप दरवडे यांच्या नेतृत्वाखाली पथक तयार करण्यात आले होते.

३ सप्टेंबर रोजी पथक कोतवाली पोलीस ठाणे हद्दीत अवैध व्यवसायांची माहिती घेत असताना संजीवनी कॉलनी परिसरात एका महिलेच्या घरात वेश्या व्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी पंचांसमक्ष खात्री करण्यासाठी पथकातील एका कर्मचाऱ्यास बनावट ग्राहक म्हणून पाठविले. माहितीची खात्री झाल्यानंतर पोलिसांनी संबंधित घरावर छापा टाकला.

छाप्यावेळी झिनत फैय्याजअली महंमद हिला ताब्यात घेण्यात आले. घराची झडती घेतली असता दोन महिला आढळून आल्या. चौकशीत संबंधित महिलेने त्यांना वेश्या व्यवसायासाठी आणल्याचे तसेच ग्राहकांकडून पैसे घेऊन त्यातील काही रक्कम त्यांना देत असल्याचे सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले. पोलिसांनी दोन्ही महिलांची सुटका केली.

या प्रकरणी झिनत महंमद हिच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 845/2026 अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, 1956 मधील कलम 3, 4, 5, 7 व 8 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

शिक्षक दिनी विद्यार्थी स्वयंशासन दिन उपक्रमाने साजरा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ सप्टेंबर

छात्र अध्यापक अध्यापिका यांनी स्वयंशासन दिनानिमित अध्यापन व शालेय कामकाज सांभाळून आपल्या शिक्षक गुरू यांचा केला सन्मान.जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथे भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिनी विद्यार्थी यांनी छात्र अध्यापक व अध्यापिका भूमिका पार पडून साजरा केला. मुख्याध्यापिका म्हणून ज्योत्स्ना पाटील,उपमुख्याध्यापक दुर्गा वारंगणे,गायत्री मंडवे,पर्यवेक्षक देवयानी घन

छात्र अध्यापक वैभव ढगे ,आदित्य पवार आदि यांनी कामकाज पाहिले.

परिपाठ पासून उपक्रमाला डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा प्रतिमा अभिवादन करून उपक्रम सुरू करण्यात आला. दिवसभर सर्व छात्र अध्यापक यांनी अध्यापन केले व सर्व शालेय कामकाज विद्यार्थी अध्यापक यांनी पार पाडले. उत्कृष्ट छात्र अध्यापक म्हणून गायत्री बावस्कर व आदित्य पवार यांची निवड करण्यात आली.स्वयंसेवक गोपाल जुनघरे कामकाज पाहिले.

यावेळी सर्व छात्र अध्यापक यांनी आपल्या गुरूंचा सत्कार करीत भेट देऊन सन्मान केला या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक संजय शहापूरकर,शिक्षणप्रेमी सदस्य तथा कृषी भूषण अरुण सोहनी यांची प्रमुख उपस्थित होती.यावेळी विद्यार्थी यांनी आपल्या शिक्षक यांचे प्रति व आज आलेल्या अनुभव कथन केले,सत्कार उत्तर देताना भास्कर चौधरी व दौलतसिंग परदेशी यांनी शिक्षकांचे जीवनातील स्थान तसेच विद्यार्थी अध्यापक यांचे कौतुक प्रमुख पाहुणे यांनी केले यावेळी मुख्याध्यापक दादाराव राठोड,शिक्षक शिवाजी नवले,विद्याधर बागुल,राजेंद्र उंबरकर,तुकाराम पायाघन,संगीता सोनवणे,जया वाघ, संतोष भारद्वाज,नंदिनी खेडकर,सचिन ढगे,शिवराम आगे,सोनू देसले सेवक,प्रवीण चवळे यांचे सह सर्व छात्र अध्यापक अध्यापिका ,विद्यार्थी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्र संचलन गायत्री बावस्कर हिने केले तर आभार देवयानी मिसाळ हिने मानले तसेच आनंदाची बाब म्हणजे गुणवत्ता पूर्ण शाळा म्हणून जिल्हा परिषद प्रशालेचा जिल्हा परिषद छ.संभाजीनगर येथे जिल्हा परिषद अध्यक्ष,शिक्षण सभापती,मुख्यकार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी व पदाधिकारी यांचे हस्ते गौरविण्यात आले आहे.

ट्रान्सफॉर्मर निर्मिती प्रकल्पातून पहिला ट्रान्सफॉर्मर तयार

छत्रपती संभाजीनगर : अभियांत्रिकी क्षेत्रातील आघाडीची कंपनी आणि इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग उद्योगातील प्रमुख कंपनी सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेड (सीजी) ने आज मध्य प्रदेशातील सीहोर येथे उभारलेल्या आपल्या नवीन ग्रीनफिल्ड उत्पादन प्रकल्पातून पहिला पॉवर ट्रान्सफॉर्मर तयार झाल्याची घोषणा केली.५० एकर क्षेत्रावर विस्तारलेला हा प्रकल्प भारतामधील एकाच ठिकाणी असलेला सर्वात मोठा पॉवर ट्रान्सफॉर्मर निर्मिती प्रकल्प आहे. या प्रकल्पात २२० केव्ही ते १२०० केव्ही क्षमतेच्या श्रेणीतील पॉवर ट्रान्सफॉर्मर्सची निर्मिती केली जाणार असून, दरमहा ३५ पॉवर ट्रान्सफॉर्मर्स तयार करण्याची क्षमता या प्रकल्पाची आहे. पहिला ट्रान्सफॉर्मर तयार झाल्याच्या या महत्त्वपूर्ण प्रसंगी मध्य प्रदेशचे माननीय मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव उपस्थित होते.

एआय प्लस चा 'नेक्स्ट क्वांटम ओएस 1.1'

मुंबई - डेटा सार्वभौमत्व आणि सुरक्षिततेच्या बांधिलकीचा भाग म्हणून 'नेक्स्ट क्वांटम'मध्ये कठोर 'सॉव्हरिन डेटा बाउंड्री' लागू करण्यात आली आहे. त्यामुळे ॲप्लिकेशन्समधून होणारी १०० टक्के डेटा वाहतूक भारतातच उपलब्ध असलेल्या आणि भारतात होस्ट केलेल्या पायाभूत सुविधांमधून केली जाते. परिमिती सुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी या प्रणालीद्वारे १,००० हून अधिक कनेक्शन्स आणि १७२ स्वतंत्र गंतव्य आयपींच्या सोर्स नियमांचे स्वयंचलित विश्लेषण केले जाते.

IIFL FINANCE

आयआयएफएल फायनान्स लिमिटेड CIN: L67100MH1995PLC093797
नोंदणीकृत कार्यालय: आयआयएफएल हाऊस, सन इन्फोटेक पार्क, रोड क्र. 16व्ही, प्लॉट क्र. बी-23, ठाणे औद्योगिक क्षेत्र, वागळे इस्टेट, ठाणे – 400604
दूरध्वनी: 022-41035000 • फॅक्स: 022-25806654 • टोल-फ्री: 1860-267-3000
ई-मेल: gold-helpline@iifl.com • वेबसाइट: www.iifl.com

सार्वजनिक सूचना – तारण ठेवलेल्या सोन्याच्या मालमत्तेचा लिलाव

याद्वारे संबंधित कर्जदार/कर्जदारांना, त्यांच्या कायदेशीर वारसांना तसेच सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, एक भारतीय रिझर्व्ह बँकेत नोंदणीकृत बिगर-बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी), आयआयएफएल फायनान्स लिमिटेड ("आयआयएफएल") येथे नमूद केलेल्या कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या तारणमालमत्तेचा सार्वजनिक लिलाव आयोजित करीत आहे. संबंधित कर्जदारांनी लिलावाच्या सूचना व उपलब्ध पत्रव्यवहार माध्यमांद्वारे पाठविण्यात आलेल्या स्मरणपत्रांनंतरही आपल्या कर्जाची परतफेड किंवा खाते नियमित केलेले नसल्यामुळे, भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या लागू निर्देशांनुसार ("आरबीआय निर्देश"), कर्ज करारातील अटी व शर्ती तसेच आयआयएफएलच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या सुवर्ण कर्ज (गोल्ड लोन) धोरणानुसार हा लिलाव करण्यात येणार आहे.

लिलावाची तारीख, वेळ आणि ठिकाण: सार्वजनिक लिलाव दि. **१५.०९.२०२६** रोजी **सकाळी १०:०० वाजल्यापासून** पुढे नमूद आयआयएफएल शाखेत आयोजित करण्यात येईल – **पहिला मजला, कडबी मंडी, जुना मोंढा रोड, आंध्र बँकेच्या मागे, जालना, महाराष्ट्र, ४३१२०३.**
हा लिलाव त्याच जिल्ह्यातील कर्ज वितरण करणाऱ्या शाखांच्या कर्ज खात्यांशी संबंधित आहे.

सुवर्ण कर्ज (गोल्ड लोन) खात्यांचा तपशील: कर्ज खात्यांचे क्रमांक – GL45228229, GL39586388, GL38152447, GL38161669, GL39965273, GL39317477, GL38856000, GL40450122, GL40219804, GL41969662, GL42129628, GL42236425, GL42376515, GL43176630, GL42642820, GL40515092, GL40542746, GL40561548, GL40630355, GL40950134, GL40973718, GL40983546, GL44918613, GL46108223, GL43649145, GL47013951, GL41279891, GL41282431, GL42387184, GL41352100, GL43297476, GL41352748, GL41364358, GL41373845, GL45406022, GL44178835, GL45186505, GL46022596, GL41455300, GL41453539, GL46868161, GL41496285, GL41497238, GL41710906, GL43943262, GL43915793, GL45411113, GL44223353, GL44215886, GL44468694, GL44521755, GL47233902, GL47966130, GL48080165, GL48432634, GL48701924, GL48729354, GL48824078, GL50741109, GL50742902, GL38814075, GL48019814, GL45424733, GL39163113, GL40696748, GL39178607, GL39165201, GL40958612, GL41347464, GL49405381, GL48330718, GL47906111, GL41378130, GL41383721, GL43466623, GL44699267, GL51188643, GL41398197, GL41399009, GL44924137, GL41401301, GL41422313, GL41582769, GL41590490, GL41641167, GL41647820, GL41693591, GL41695583, GL48386178, GL48688257, GL48758771, GL48890840, GL50680779, GL50677295, GL39028229, GL42058992, GL41255641, GL41253740, GL41700895.

थकबाकीदार कर्जदारांची नावे, तारण ठेवलेल्या सोन्याच्या मालमत्तेचा तपशील तसेच संबंधित कर्ज वितरण शाखेचा पत्ता हा संबंधित कर्ज वितरण शाखेत आणि वरील लिलाव केंद्रावर प्रदर्शित करण्यात आलेला आहे. तसेच ही माहिती आयआयएफएलच्या ग्राहक सेवा केंद्रावर 1860-267-3000 या क्रमांकावर किंवा www.iifl.com या संकेतस्थळावरूनही प्राप्त करता येईल.

लिलावापूर्वी कर्जाची परतफेड करण्याचा अधिकार: कर्जदार/कायदेशीर वारस लिलावाच्या तारखेपर्यंत कोणत्याही वेळी कर्ज करार आणि मुख्य माहिती निवेदन (केएफएस) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण थकीत रक्कम, अद्ययावत व्याज तसेच लागू असलेले सर्व शुल्क भरून कर्ज खाते बंद करू शकतात किंवा नियमित करू शकतात. अशा परिस्थितीत संबंधित कर्ज खाते लिलावातून वगळण्यात येईल.
या प्रकाशनाच्या तारखेला किंवा त्यानंतर बंद केलेल्या किंवा नियमित केलेल्या खात्यांकडून प्रमाणशीर प्रकाशन शुल्क वसूल केले जाईल.

मृत कर्जदार: ज्या प्रकरणांमध्ये कर्जदाराचे निधन झाले आहे, त्या प्रकरणांमध्ये ही सूचना आणि लिलावाच्या अटी कर्जदाराच्या कायदेशीर वारसांनाही लागू राहतील.

राखीव किंमत: भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांनुसार निश्चित करण्यात आलेल्या तारण ठेवलेल्या सोन्याच्या विद्यमान मूल्याच्या किमान 90% (ज्या कर्ज खात्यांमध्ये लिलाव दोन वेळा अयशस्वी ठरला आहे, त्यांच्यासाठी 85%) इतक्या राखीव किंमतीच्या अधीन राहून लिलाव करण्यात येईल.

मला आवडणारा भारद्वाज पक्षी त्याचे तांबूस पिंगट रंगाचे मऊ मखमली पंख पसरत गुंजासारख्या किरमीजी रंगाच्या डोळ्यांनी माझ्याकडे बघत ऐटीत कठड्यावरून चालत जात होता. मग क्रुप क्रुप क्रुप असा आवाज करत झाडाच्या फांदीवर जाऊन बसला. त्याला प्रत्युत्तर ही कुठूनसे येत होते. आकाश एकाच वेळी अनेकविध रंगांची उधळण करीत होता. आपण जणू एखाद्या अभयारण्याची सैर करतो आहोत असा भास होत होता. अशा विविध पक्ष्यांचे आवाज आता भर दिवसाही ऐकू येतात. दुर्लभ झालेल्या चिऊताई पण दिसू लागल्यात हल्ली. ही मंडळी प्रदूषणापासून तात्पुरती सुटका झाल्याचा आनंद तर मनवत नसतील? मग लक्षात आले निसर्ग चुकत नाही आपल्यालाच कुठे ही दृष्टी असते.

कुठे शोधिसि रामेश्वर अन कुठे शोधीसि काशी
हृदयातील भगवंत राहिला हृदयातून उपाशी
निसर्गाची श्रीमंती तर विनामूल्य आपल्या दारात अवतरली आहे फक्त नजर शाबूत हवी...

स्नेहल खंडागळे/नागपूर

■■■

गणेशोत्सव व वर्गणी

महाराष्ट्र राज्य हे विविध प्रकारच्या परंपरेने नटलेले राज्य आहे. त्यातील प्रमुख उत्सव म्हणजे सार्वजनिक गणेशोत्सव होय. या उत्सवाचे जनक लोकमान्य टिळक आहेत. टिळकांचा उद्देश गणेशोत्सवाच्या माध्यमातून परिसरातील लोक एकत्र जमतील असा होता. गणेशोत्सव आणि वर्गणी हा विषय अत्यंत आनंदाचा क्षण असतो. मात्र हा विषय आजच्या आधुनिक काळात चिंताजनक व भयभीत करणारा ठरत आहे. वर्गणी हा असा विषय आहे की ती प्रत्येकाने आपल्या परिस्थितीनुसार देण्याची क्रिया आहे. वर्गणीचे रूपांतर कधी कधी खंडणीप्रमाणे होते. हे असे चिंताजनक व भीषण चित्र आपणास हमखास बघावयास मिळते. काही लोकांनी वर्गणी कमी दिली असता त्या लोकांबाबत अपशब्द बोलणे, त्या व्यक्तीबद्दल असामाजिक वक्तव्य करणे, संपूर्ण समाजासमोर निंदा करणे ही परिस्थिती दिवसेंदिवस वाढत आहे. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे समूहामध्ये प्रत्येकासाठी एक ठरावीक रक्कम ठरवली जाते. समूहातील काही सदस्यांची आर्थिक परिस्थिती नसते. रक्कम देणे जमत नाही. मंडळातील सगळे सदस्य त्या सदस्यासोबत सगळ्या दृष्टीने भेदभाव करतात व त्या सदस्याला मंडळातून डावलण्यात येते. यापुढे मंडळाने केवळ वर्गणीच मागावी, त्याला खंडणीचे स्वरूप येऊ नये.

अक्षय उपगडे/नागपूर

■■■

अकोल्याचे श्री राजराजेश्वर

अकोल्याच्या इतिहासाच्या खुणा शोधताना आपली पावले एका प्राचीन शिवमंदिरापाशी येऊन थबकतात. आख्यायिका, भक्ती आणि श्रद्धेने वेढलेले श्री राजराजेश्वर मंदिर सांस्कृतिक अस्मितेचे जिवंत प्रतीक आहे. या प्राचीन मंदिराच्या शिवलिंगाशी जोडलेली एक अद्भुत आख्यायिका आजही अकोलेकरांच्या ओठांवर आहे. अकोलसिंग नावाचा एक राजा या परिसरात राज्य करीत होता. त्याची राणी शिवभक्त होती. दररोज मध्यरात्री ती शिवलिंगाचे पूजन करण्यासाठी मंदिरात येत असे. कालांतराने राजाच्या मनात राणीबद्दल गैरसमज निर्माण झाला. राजाने राणीचा पाठलाग केला. पाठलाग करता करता तो दाट जंगलाने वेढलेल्या शिवलिंगाजवळ येऊन पोहोचला. राजाचा क्रोध

पाहून राणी भयभीत झाली. संकटाच्या त्या क्षणी त्या दाट अरण्यात तिने कुणाचा आधार घ्यायचा? तिने भगवान शिवाला आर्त हाक घातली... आणि मग घडला तो अद्भुत चमत्कार... शिवलिंग दुभंगले आणि राणीला त्याने आपल्यात सामावून घेतले व शिवलिंग पूर्ववत झाले. क्षणभरात घडलेली ही घटना पाहून राजा स्तब्ध झाला. त्याने राणीला थांबविण्याचा आटोकाट प्रयत्न केला; पण वेळ निघून गेली होती. राणीच्या साडीच्या पदराचे टोक आणि वेणीतील काही केस बाहेर होते, असे सांगितले जाते. आपल्या कृत्याची जाणीव होताच राजाला पश्चात्ताप झाला. राणीच्या भक्तीपुढे आणि भगवान शिवाच्या सामर्थ्यापुढे त्याचा अहंकार क्षणात विरघळून गेला. या अकोलसिंग राजाच्या नावावरूनच पुढे या गावाचे नाव 'अकोला' पडले असल्याचे म्हणतात. आजही श्री राजराजेश्वर मंदिरात तेथील भव्य शिवलिंगाच्या मध्यभागी दिसणारी भेग त्या घटनेची साक्ष देते. 'भक्ताच्या हाकेला धावून येणारा देव' अशी अकोलेकरांची श्रद्धा आहे. वर्षभर या मंदिरात भाविकांची वर्दळ असतेच; पण दर सोमवारी मोठी गर्दी असते. महाशिवरात्रीच्या पर्वावर परिसर भक्तिसागरात न्हाऊन निघतो. श्रावण महिना सुरू झाला की अकोल्याच्या वातावरणात एक वेगळे चैतन्य निर्माण होते. 'हर हर महादेव'च्या जयघोषात मंदिर परिसर दुमदुमून जातो. श्रद्धेचे केंद्र, अस्मितेचे प्रतीक असलेले श्री राजराजेश्वराचे शिवलिंग अत्यंत प्राचीन असून भगवान शिव आणि पार्वतीचा प्रत्यक्ष वास येथे आहे, अशी भाविकांची श्रद्धा आहे. आजच्या धावपळीच्या जीवनातही मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करताच मनाला एक वेगळीच शांतता लाभते. श्री राजराजेश्वर हे केवळ अकोल्याचे ग्रामदैवत नाही, तर अकोल्याच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अस्मितेचे जिवंत प्रतीक आहे. ■

अखिल देशपांडे/अकोला। ९७६७१५१८३०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

'शेतकरी मेळावा अपडेट

महापालिका कर्मचारी गणेश महामंडळाच्या अध्यक्षपदी आयुक्त नितीन नार्वेकर : विनय ठाकूर यांची कार्याध्यक्षपदी निवड

परभणी,/प्रतिनिधी : परभणी महानगरपालिका कर्मचारी-अधिकारी गणेश महामंडळाची बैठक विकास रत्नपारखे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने महामंडळाच्या नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी आयुक्त नितीन नार्वेकर यांची अध्यक्षपदी, तर विनय ठाकूर यांची कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

महामंडळाच्या उपाध्यक्षपदी लक्ष्मण जोगदंड, सरचिटणीसपदी मनोज गहलोत, कोषाध्यक्षपदी कुणाल भारसाकळे, तर सहसचिवपदी संगीता उबाळे यांची निवड करण्यात आली. आरती प्रमुख म्हणून दिलीप बनसोडे, मनोज गहलोत, भागवत कडनूर आणि ज्योती मोरे यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणीच्या सदस्यपदी प्रकाश गायकवाड, किरण गायकवाड, शेख इस्माईल, जोगिंदर काकडा, ज्ञानोबा मस्के, राहुल तालेवार, गोपाल मोहटे आणि विनोद गहलोत यांची निवड करण्यात आली.

बैठकीत गणेशोत्सवाच्या आयोजनासह विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन, कर्मचारी-अधिकाऱ्यांचा सहभाग आणि उत्सव शांततेत व उत्साहात पार पाडण्याबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीस महामंडळाचे नवनिर्वाचित पदाधिकारी तसेच महानगरपालिकेतील कर्मचारी-अधिकारी उपस्थित होते.

'देवा भाऊ रजक समृद्धी योजना' कार्यान्वित करण्यासाठी धोबी व्यवसायिकांची बैठक

परभणी,/प्रतिनिधी : 'देवा भाऊ रजक समृद्धी योजना' कार्यान्वित करण्यासह धोबी समाजाच्या विविध मागण्यांवर चर्चा करण्यासाठी परभणी येथे धोबी व्यवसायिकांची बैठक पार पडली. या वेळी भारतीय जनता पक्षाच्या उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या बैठकीत धोबी व्यवसायाला आधुनिक स्वरूप देण्याबरोबरच व्यवसायिकांच्या विविध समस्या शासनस्तरावर सोडवण्यासाठी मुंबई येथे आयोजित करण्यात येणाऱ्या महामेळाव्याचे निमंत्रणही उपस्थितांना देण्यात आले. धोबी व्यवसायिकांना व्यवसायासाठी शासकीय स्तरावर जागा, पाणी आणि वीज उपलब्ध करून द्यावी, इस्त्री व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींची असंघटित कामगार म्हणून नोंदणी करावी, धोबी व्यवसायासाठी आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी इतर मागासवर्गीय महामंडळाच्या माध्यमातून ९० टक्के अनुदान उपलब्ध करून द्यावे, तसेच महावितरणकडून धोबी व्यवसायासाठी आकारण्यात येणाऱ्या वीजदरात आवश्यक दुरुस्ती करून औद्योगिक दरानुसार वीज उपलब्ध करून द्यावी आदी मागण्यांसाठी मुंबई येथे महामेळावा आयोजित करण्यात असल्याचे वाकोडकर यांनी म्हटले.

दरम्यान, मुंबई येथील प्रस्तावित महामेळाव्यात धोबी समाजाच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

हेलस येथे 'जागर श्यामच्या कथांचा' उपक्रम : ४२ दिवसांत 'श्यामची आई'तील ४२ संस्कारक्षम कथा; शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन

सेलू,/प्रतिनिधी : अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला शाखा, हेलस या शाखेने तीन दशकांची यशस्वी वाटचाल पूर्ण करून ३२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. या वर्धापनदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबत मनोरंजन आणि सुसंस्कार रुजविण्याच्या उद्देशाने पूज्य साने गुरुजी यांच्या 'श्यामची आई' या पुस्तकावर आधारित 'जागर श्यामच्या कथांचा' हा अभिनव उपक्रम मंगळवार ८ सप्टेंबर पासून सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे हे सहावे वर्ष आहे.

या उपक्रमांतर्गत 'श्यामची आई' पुस्तकातील दररोज एक याप्रमाणे सलग ४२ दिवस ४२ संस्कारक्षम कथा ऑडिओ स्वरूपात व्हॉट्सप समूहांवर पाठविण्यात येणार आहेत. शाळेतील परिपाठाच्या वेळी अथवा वर्गाच्या व्हॉट्सप समूहावर या कथा विद्यार्थ्यांना ऐकविण्यात येणार आहेत. कथा ऐकल्यानंतर उपक्रमाच्या अखेरीस ऑनलाइन परीक्षा घेण्यात येणार असून, सहभागी सर्व विद्यार्थी आणि शाळांना ऑनलाइन सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

या उपक्रमातील कथांचे उत्कृष्ट अभिवाचन छत्रपती संभाजीनगरच्या उपविभागीय अधिकारी अंजली धानोरकर यांनी केले आहे. या ऑडिओ कथांची निर्मिती राजेंद्र जोशी यांनी केली आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साने गुरुजींच्या संस्कारक्षम साहित्याचा विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे प्रसार करण्याचा हा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले. 'श्यामची आई'मधील कथा विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कार करणाऱ्या असून, त्यातून आई-वडिलांप्रती आदर, प्रेम, प्रामाणिकपणा, त्याग, माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी यांसारखी जीवनमूल्ये रुजण्यास मदत होणार आहे. विद्यार्थ्यांनी या कथा नियमितपणे ऐकून त्यातील मूल्ये आपल्या आचरणात आणावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

या उपक्रमात शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजिका कल्पना दत्तात्रय हेलसकर, डॉ. सुहास सदाव्रते, सतीश कुलकर्णी, बाबासाहेब हेलसकर, विजय वायाळ, प्रमोद देशमुख, मंताजी ढाकरे, आर. आर. जोशी, जमीर शेख आणि ईश्वर मोताळे यांनी केले आहे.

मुलाच्या वाढदिवसानिमित्त २२६ पुस्तके शाळेला भेट : बोरवंड बु. येथील मन्मथ लासे यांचा स्तुत्य उपक्रम; अनावश्यक खर्चाला फाटा देत वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन

परभणी,/प्रतिनिधी : मुलाच्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्चाला फाटा देत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने बोरवंड बु. येथील शिक्षणप्रेमी मन्मथ रामभाऊ लासे यांनी आपला मुलगा आरव याच्या दुसऱ्या वाढदिवसानिमित्त बोरवंड बु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वाचनालयास ६ हजार ६४० रुपये किमतीची २२६ पुस्तके भेट दिली.

या पुस्तकांमध्ये चरित्र, विज्ञान, बोधकथा, 'शाळेबाहेरची शाळा', प्रदूषण, पंचतंत्र, इंग्रजी तसेच विविध विषयांवरील पुस्तकांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, त्यांना मोबाईलपासून दूर ठेवता यावे, त्यांच्या ज्ञानात भर पडावी, विचार प्रगल्भ व्हावेत आणि विद्यार्थ्यांमध्ये संस्कारांची रुजवण व्हावी, या उद्देशाने ही अनोखी भेट देण्यात आली. 'आपण ज्या शाळेत शिकलो, त्या शाळेचे आपण देणे लागतो' या भावनेतून लासे यांनी हा उपक्रम राबविला. शाळेत सुरू असलेल्या वाचन उपक्रमाला या पुस्तकांमुळे आणखी चालना मिळणार असून, विद्यार्थ्यांना विविध विषयांचे अवांतर वाचन करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांची वेतनवाढ ५९ वर्षांपासून प्रलंबित

तुटपुंज्या मानधनावर उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर; 'सांगा, जगायचे तरी कसे?' असा ग्रंथालय सेवकांचा सवाल

संपत तेली

पूर्णा,/प्रतिनिधी:- महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळीला चालना देण्यासाठी १९६७ मध्ये महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा अस्तित्वात आला आणि १ मे १९६८ पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. त्यावेळी 'गाव तेथे ग्रंथालय' अशी घोषणा करण्यात आली होती. मात्र, कायद्याला सुमारे सहा दशके उलटूनही ग्रंथालय चळवळीच्या अपेक्षित उद्दिष्टांची पूर्णतः पूर्तता झालेली नाही. त्यातच सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये वर्षानुवर्षे सेवा देणाऱ्या ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

सार्वजनिक ग्रंथालयाच्या कामकाजात ग्रंथालय सेवक, ग्रंथपाल कर्मचारी महत्त्वाचे घटक आहेत. मात्र, शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये अत्यंत तुटपुंज्या मानधनावर हे कर्मचारी सेवा बजावत आहेत. वाढती महागाई, घरभाडे, शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन जीवनावश्यक खर्चाच्या तुलनेत मिळणारे मानधन अत्यल्प असल्याने अनेक कर्मचाऱ्यांसमोर कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे अनेक ग्रंथालय सेवक गेल्या २५ ते ३५ वर्षांहून अधिक काळ प्रामाणिकपणे सेवा बजावत असून, ग्रामीण व शहरी भागात वाचनसंस्कृती रुजविण्याबरोबरच विद्यार्थ्यांचे करिअर घडविण्यात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. बी.लिब., एम.लिब. यांसारख्या शैक्षणिक पात्रता असूनही अनेक कर्मचाऱ्यांना अत्यल्प वेतनावर काम करावे लागत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. डिजिटायझेशनच्या युगात सार्वजनिक ग्रंथालयांचे कामकाजही मोठ्या प्रमाणात डिजिटल झाले आहे. वाचकांना आधुनिक सुविधा देण्याची जबाबदारी ग्रंथालय कर्मचाऱ्यांवर आहे. मात्र, त्याच कर्मचाऱ्यांना समाधानकारक वेतन मिळत नसल्याने शासनाच्या धोरणातील ही विसंगती दूर करण्याची मागणी होत आहे. राज्य शासनाकडून वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' यासारखे विविध उपक्रम राबविले जात आहेत. सार्वजनिक ग्रंथालये ही ज्ञान, शिक्षण आणि संस्कृतीची केंद्रे म्हणून कार्यरत असताना या केंद्रांचा कणा असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न मात्र अद्याप सुटलेला नाही. गेल्या तीन-चार दशकांपासून सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागत असल्याने शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. समित्या स्थापन झाल्या; चर्चा झाल्या; शिफारशींची अंमलबजावणी मात्र रखडली महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा व संबंधित नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या. १९७३ मध्ये प्रभा राव समिती, १९७८ मध्ये वि. स. पागे समिती तसेच त्यानंतर व्यंकप्पा पत्की समितीच्या माध्यमातून ग्रंथालय क्षेत्रातील समस्या व सुधारणांबाबत शिफारशी करण्यात आल्या. मात्र, या शिफारशींच्या प्रभावी अंमलबजावणीअभावी ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे प्रश्न अद्याप कायम आहेत. 'गाव तेथे ग्रंथालय' ही घोषणा होऊनही राज्यातील मोठ्या लोकसंख्येला अद्याप पुरेशी ग्रंथालय सेवा उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे ग्रंथालय कायद्यात कालानुरूप सकारात्मक सुधारणा करून ग्रंथालयांचा विस्तार, आधुनिक सुविधा आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी होत आहे. राज्यात १२ हजारांहून अधिक शासनमान्य ग्रंथालये महाराष्ट्रात 'अ' वर्गाची ३३४, 'ब' वर्गाची २१०, 'क' वर्गाची ४ हजार १५३ आणि 'ड' वर्गाची ५ हजार ५४१ अशी एकूण १२ हजार १४८ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. या ग्रंथालयांमध्ये सुमारे २१ हजार ६११ ग्रंथालयीन सेवक कार्यरत असल्याचे सांगण्यात येते. एवढ्या मोठ्या संख्येने कर्मचारी वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी कार्यरत असताना त्यांच्या वेतनाचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहणे ही गंभीर बाब आहे.

वाढलेल्या प्रचंड महागाईत ग्रंथालय कर्मचाऱ्यांची उपासमार होत असतानाही शासन त्याकडे दुर्लक्ष करीत आहे राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या हिताची निर्णय अपेक्षित असतानाही घेतली जात नाही गेल्या ५८ वर्ष शासनाकडून आश्वासना व्यतिरिक्त ग्रंथालय कर्मचाऱ्यांना ची निराशा करण्यात आली आहे. शासनाने ग्रंथालय कायदा आणि नियमावली बासनात बांधून ठेवली तसेच या समितांच्या अहवालानुसार ग्रंथालयाच्या पदरात काहीच दिले नसल्याने आज राज्यात ग्रंथालय चळवळ ढासळत आहे. सतीश टाकळकर ग्रंथ मित्र

चौकट : एम.लिब.धारकांनाही सात हजारांपर्यंत वेतन?

ग्रंथालयात २५ ते ३५ वर्षांहून अधिक काळ सेवा देऊन वाचनसंस्कृती वृद्धिंगत करणाऱ्या आणि अनेक विद्यार्थ्यांचे करिअर घडविणाऱ्या कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झाली आहे. बी.लिब., एम.लिब. यांसारख्या उच्च शैक्षणिक पदव्या धारण करूनही ग्रंथालय कर्मचाऱ्यांना सहा ते सात हजार रुपयांच्या आसपासच मानधन मिळत असल्याने, वाढत्या महागाईच्या काळात कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, असा सवाल कर्मचारी उपस्थित करीत आहेत. ग्रंथालय कर्मचाऱ्यांना किमान वेतनाच्या निकषानुसार सन्मानजनक वेतन देऊन वेतनवाढीचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

महात्मा फुले विद्यालयात विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप

परभणी,/प्रतिनिधी : येथील महात्मा फुले विद्यालयाच्या भीमनगर शाखेत भारताचे माजी राष्ट्रपती तथा थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य लखनसिंह जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी गोपाल भालेराव, पर्यवेक्षक शिवाजी गणपुरकर, कथाकार राजेंद्र गहाळ, रविकुमार खंडागळे, नामदेव चापके, भारत खंदारे, पंचशिला लहाने, पांडुरंग जगताप आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण असून, ज्ञानासोबतच संस्कार आणि जीवनमूल्यांची शिकवण देण्याचे कार्य शिक्षक करीत असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले. यावेळी गोपाल भालेराव यांच्या वतीने होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी प्रोत्साहन मिळणार असल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमरनाथ कसबे यांनी केले. सूत्रसंचालन प्रदुम्न शिंदे यांनी केले, तर आभार अभिजित ठाकूर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पंचशिला लहाने, भारत खंदारे, रविकुमार शिंदे, अमरनाथ कसबे, श्रीनिवास जांभळकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परभणीत सप्टेंबरमध्येच ऑक्टोबर हिटचा सामना

परभणी,/प्रतिनिधी : शहरामध्ये गेल्या दोन दिवसापासून सप्टेंबर महिन्यातच ऑक्टोबर हिटचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत असेच तापमान कायम राहिले तर सप्टेंबर आणि ऑक्टोबर अशा दोन महिन्यात उकाडा जाणवणार आहे.

बंजारा समाजाच्या 'एसटी' आरक्षणासाठी आढे पुन्हा उपोषणावर

आश्वासनांची वर्षभर प्रतीक्षा; जिंतूर तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषण

जिंतूर,/प्रतिनिधी- बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे (एसटी) आरक्षण मिळावे, या मागणीसाठी गेल्या वर्षभरापासून लढा देणारे विनोद विश्वनाथ आढे यांनी शनिवार (ता. ५) पुन्हा उपोषण सुरू केले आहे. जिंतूर तहसील कार्यालयासमोर ते उपोषणास बसले असून, शासनाकडून वारंवार आश्वासने मिळूनही मागणीवर ठोस निर्णय होत नसल्याने त्यांनी आंदोलनाचे पाऊल उचलले आहे.

निवेदनानुसार, ५ सप्टेंबर २०२५ रोजी आढे यांनी याच मागणीसाठी उपोषण केले होते. त्यावेळी प्रशासनाकडून आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी उपोषण स्थगित केले. त्यानंतर ८ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री यांच्यासोबत झालेल्या बैठकीत बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाच्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी तीन महिन्यांची कालमर्यादा देण्यात आली होती. मात्र, अद्यापही ठोस निर्णय झालेला नसल्याचा आरोप आढे यांनी केला आहे. तसेच ६ एप्रिल २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे आंदोलन व उपोषण करण्यात आले होते. त्यावेळीही शासनाकडून लेखी आश्वासन देण्यात आले. मात्र, वर्षभर उलटूनही मागणीची अंमलबजावणी न झाल्याने बंजारा समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

''आता केवळ आश्वासन नको, बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणावर ठोस निर्णय हवा,'' अशी भूमिका घेत आढे यांनी पुन्हा उपोषण सुरू केले आहे. आंदोलनस्थळी संबंधित प्रशासनाने उपस्थित राहून चर्चा करावी आणि शासनाच्या आश्वासनांबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

'तरुण भारत'च्या बातमीचा दणका; पूर्णा रेल्वे स्थानकावर दिशादर्शक फलक!

प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी रेल्वे प्रशासनाची तातडीची कार्यवाही;

पूर्णा,/प्रतिनिधी- 'पूर्णा रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्मकडे जाण्यासाठी स्पष्ट दिशादर्शक फलक नसल्याने प्रवाशांची होणारी गैरसोय 'तरुण भारत'ने ४ सप्टेंबर रोजी 'प्लॅटफॉर्म कुठे आहे?' या मथळ्याखाली ठळकपणे मांडली होती. या वृत्ताची दखल घेत रेल्वे प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत स्थानकावरील पादचारी मार्गावर प्लॅटफॉर्म क्रमांकाचे दिशादर्शक फलक बसविले आहेत. स्थानकावर प्रथमच येणाऱ्या प्रवाशांना प्लॅटफॉर्म शोधताना मोठी अडचण येत होती. विशेषतः गाडीची वेळ जवळ आल्यानंतर प्रवाशांची धावपळ होत असल्याचे चित्र होते. याबाबतचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर रेल्वे प्रशासनाने तत्काळ हालचाली करत दिशादर्शक फलक लावण्याचे काम पूर्ण केले.

पादचारी पुलावर तसेच प्लॅटफॉर्मच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर आता प्लॅटफॉर्म क्रमांक स्पष्टपणे दिसतील, अशा पद्धतीने फलक लावण्यात आले आहेत. त्यामुळे बाहेरगावाहून येणाऱ्या प्रवाशांसह महिला, ज्येष्ठ नागरिक शोधणे सुलभ होणार आहे. बातमीचा परिणाम; प्रवाशांकडून समाधान

प्रवाशांची समस्या 'तरुण भारत'ने प्रभावीपणे मांडल्यानंतर रेल्वे प्रशासनाने त्याची तातडीने दखल घेतल्याने 'बातमीचा परिणाम' दिसून आला आहे. प्रशासनाने केलेल्या या कार्यवाहीचे प्रवाशांकडून समाधान व्यक्त होत असून, स्थानकावरील इतर आवश्यक सुविधांकडेही प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

सोलापूर तरुण भारत

'प्लॅटफॉर्म कुठे आहे?'; पूर्णा रेल्वे स्थानकावर प्रवाशांची तारांबळ!

दिशादर्शक फलकांचा अभाव; रेल्वे प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा प्रवाशांना फटका

पूर्णा,/प्रतिनिधी- पूर्णा रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या मार्गदर्शनासाठी आवश्यक असलेल्या प्लॅटफॉर्म दिशादर्शक फलकांचा अभाव असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. स्थानकावर दाखल झाल्यानंतर 'प्लॅटफॉर्म कुठे आहे?' असा प्रश्न अनेक प्रवाशांसमोर निर्माण होत असून, गाडीची वेळ जवळ आली की प्रवाशांची अक्षरशः तारांबळ उडत आहे. प्लॅटफॉर्म शोधण्यासाठी इकडे-तिकडे भटकावे लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी परिस्थिती अधिकच त्रासदायक ठरत असून, सामान घेऊन येणारे प्रवासी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच बाहेरगावाहून आलेल्या प्रवाशांना मार्ग शोधताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. रेल्वेची वेळ जवळ आलेली असताना जात आहे. रेल्वे प्रशासनाकडून स्थानकाच्या विविध सुविधांकडे लक्ष दिले जात असले, तरी प्रत्यक्ष प्रवाशांच्या दैनंदिन अडचणींकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. तातडीने दिशादर्शक फलक बसविण्याची मागणी पूर्णा रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक,पादचारी मार्ग, तिकीट घर,प्रवेश-निर्गमन मार्ग आदींची माहिती देणारे मोठे,

पावसाच्या खंडामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव; शेतकऱ्यांनी काळजी घेण्याचे आवाहन दिलीप उदासी यांनी केले

जिंतूर,/प्रतिनिधी- गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्यामुळे उदासी तंत्र वापरण्याचा शेतकरी बांधवांना सुचित करण्यात येत आहे की सोयाबीन व कापूस पिकावर तेजस संपदा व विराट या तीन घटकांची फवारणी केल्यास पाण्याचा ताण सहन करून पीक चांगले वाढेल व सोयाबीन चे दाणे चांगले भरतील अशी माहिती शेतकरी मित्र दिलीप उदासी यांनी शेतकरी बांधवांनाखरीप हंगामातील पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी घाबरून न जाता पिकांची नियमित पाहणी करून योग्य वेळी उपाययोजना कराव्यात, असे मत शेतकरी मार्गदर्शक दिलीप उदासी यांनी व्यक्त केले.

पावसामध्ये दीर्घ खंड पडल्याने जमिनीतील ओलावा कमी होत असून पिकांची वाढ मंदावण्याची शक्यता आहे.

विशेषतः सोयाबीन, तूर, कापूस, हळद तसेच फळबागांमध्ये पिकांची पाने पिवळी पडणे, पाने वाळणे, मुळांची वाढ कमी होणे आणि विविध बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव दिसून येऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतात नियमित फेरफटका मारून पिकांच्या स्थितीचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. दिलीप उदासी यांनी सांगितले की, रोगाचे नेमके कारण ओळखल्याशिवाय कोणतीही औषध फवारणी करू नये. पिकावर रोगाची लक्षणे दिसून आल्यास कृषी विभागातील अधिकारी, कृषी तज्ज्ञ किंवा कृषी विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसारच औषधांची निवड करावी. अनावश्यक किंवा चुकीच्या औषधांच्या फवारणीमुळे उत्पादन खर्च वाढण्याबरोबरच पिकाचे नुकसान होऊ शकते. पावसाचा खंड पडलेल्या काळात शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा. शक्य असल्यास ठिबक किंवा तुषार सिंचनाचा वापर करून पिकाला आवश्यक तेवढाच ओलावा उपलब्ध करून द्यावा. शेतात पाणी साचणार नाही आणि जमिनीतील ओलावा टिकून राहील, याचीही काळजी घेणे गरजेचे आहे. सोयाबीन पिकामध्ये पाने, खोड, शेंगा यांची नियमित पाहणी करावी. किडी किंवा रोगाची सुरुवातीची लक्षणे आढळल्यास तज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य उपाययोजना करावी. हळद, कापूस आणि फळबागांमध्येही पिकाच्या अवस्थेनुसार व्यवस्थापन करणे हा सल्ला शेतकरी बांधवांना शेतकरी मित्र दिलीप उदासी यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे

क्रीडा दिन

डॉ. गौरव कुमार

हे आहे भारतातील पहिले 'स्टेडियम'



ढोलवीराचे विशाल मैदान हे नागरी विचारांचे द्योतक आहे, ज्याने सामूहिक जीवनासाठी शहरात पुरेशी जागा सुरक्षित केली. सार्वजनिक जागा, सहभाग आणि शारीरिक क्रियाकलाप हे काही आधुनिक संकल्पनेचे केवळ आविष्कार नाहीत हे समजण्यास धोलावीरा आपल्याला मदत करते. त्यांची मुळे मानवी सभ्यतेच्या प्राचीन शहरी अनुभवांमध्ये देखील शोधली जाऊ शकतात.

कच्छच्या ग्रेट रणमधील खदिर बेटावर स्थित धोलावीरा त्याच्या अद्भूत जल व्यवस्थापन प्रणाली, विशाल जलाशय, तटबंदी आणि सुव्यवस्थित शहर नियोजनासाठी अनेकदा लक्षात ठेवले जाते. परंतु या प्राचीन शहरामध्ये एक विस्तीर्ण, सपाट आणि स्पष्टपणे बांधलेले खुले संकुल देखील होते, जे हडप्पा समाजाचे सामुदायिक जीवन आणि सार्वजनिक क्रियाकलाप समजून घेण्याची एक महत्त्वाची संधी प्रदान करते.

या मैदानाचा नेमका उपयोग काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाशी संबंधित पुरातत्त्वशास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. आर. एस. बिश्त यांनी ढोलवीराच्या उत्खनन आणि नागरी मांडणीचा सविस्तर अभ्यास करताना या भागाचे वर्णन कधी 'विधी मैदान' तर कधी 'स्टेडियम' असे केले. 'स्टेडियम' हा शब्द नक्कीच आकर्षक आहे, पण तो काळजीपूर्वक समजून घेतला पाहिजे. आधुनिक स्टेडियम हे प्रेक्षक गॅलरी, खेळण्याचे निश्चित नियम, खेळाडू आणि औपचारिक स्पर्धांशी संबंधित आहे. धोलावीरा येथे कोणताही लेखी पुरावा उपलब्ध नाही, ज्यामुळे त्याचा क्रीडा संकुल म्हणून वापर झाल्याचे सिद्ध होते. त्यामुळे याला 'स्टेडियमसमान सार्वजनिक संकुल' म्हणणे अधिक समतोल ठरेल.

नियोजित सार्वजनिक संकुल

डॉ. आर. एस. बिश्त यांच्या मते, हे मैदान अंदाजे २८३ मीटर लांब आणि ४५-४७.५ मीटर रुंद होते. त्याची लांबलचक आयताकृती रचना, नियंत्रित प्रवेशद्वार, स्पष्ट सीमा, उंच बाजू आणि सपाट पृष्ठभाग हे सूचित करतात की, ते विशिष्ट सांप्रदायिक हेतूसाठी डिझाईन केले गेले होते. एवढ्या मोठ्या कॉम्प्लेक्ससाठी बांधकाम, सपाटीकरण आणि देखभाल यासाठी सामूहिक श्रम आणि दीर्घकालीन नियोजन आवश्यक होते. त्यामुळे याला शहरातील सामान्य रिकामी जागा मानणे योग्य होणार नाही. मैदानाची स्थितीही लक्षवेधी आहे. हे शहराच्या मध्यवर्ती भागात, मध्य शहर आणि खालच्या शहराच्या दरम्यान स्थित होते. हे सूचित करते की, येथे प्रवेश केवळ एका वर्गापुरता मर्यादित नसावा.

सिटाडेल, मीडल टाऊन आणि लोअर टाऊनमधून त्यात प्रवेश करण्याची शक्यता या दृष्टिकोनास बळकट करते की, ते व्यापक समुदाय वापराचे एक जटिल असू शकते. काही विवेचनांमध्ये येथे कुस्ती, मार्शल आर्ट्स, प्रशिक्षण, रथ शर्यती किंवा इतर शारीरिक क्रियाकलाप होण्याची शक्यता व्यक्त केली गेली आहे. धार्मिक समारंभ, उत्सव, मिरवणुका, सार्वजनिक घोषणा, सभा आणि प्रात्यक्षिकेही येथे झाली असतील.

स्टेडियम बोर्ड

या शक्यतांना स्थापित तथ्ये म्हणून न पाहता साईटच्या संरचनेवर आणि उपलब्ध पुरातत्त्वीय संकेतांवर आधारित गृहितके म्हणून पाहिले पाहिजे. ढोलावीरा त्याच्या अभियांत्रिकी कार्यक्षमतेसाठी प्रसिद्ध आहे. मजबूत दगडी बांधकाम, सुविचारित ड्रेनेज सिस्टीम आणि जवळचे जलाशय अशी वैशिष्ट्ये सूचित करतात की, शहर नियोजकांनी सार्वजनिक जागांचा वापर आणि देखभाल करण्याचा देखील विचार केला असावा. हडप्पा नगर योजनेच्या परिपक्वतेचा हा महत्त्वाचा पुरावा आहे.

क्रीडा पुरावा आणि सामाजिक जीवन

ढोलावीरा येथून मातीचे फासे, दगडी खेळाचे फलक आणि विविध प्रकारची शिल्पे सापडली आहेत. हडप्पाचे जीवन केवळ उत्पादन, व्यापार आणि प्रशासनापुरते मर्यादित नव्हते, असे या वस्तूंवरून दिसून येते. लोकांना फुरसती मिळाली, खेळले गेले आणि मनोरंजनाच्या विविध पद्धतींचा त्यांना संपर्क झाला. खेळ म्हणजे फक्त मनोरंजन नाही. ते कौशल्य विकसित करतात, नियमांची सामायिक समज निर्माण करतात, सामाजिक संबंध मजबूत करतात आणि सामूहिक ओळख बनवतात. या दृष्टिकोनातून ढोलवीराच्या विस्तीर्ण मैदानाला विशेष महत्त्व आहे.

जर लहान खेळ घरांमध्ये किंवा मर्यादित गटांमध्ये खेळले गेले असते, तर असे मोठे कॉम्प्लेक्स मोठ्या समुदाय कार्यक्रमांसाठी योग्य असते. शारीरिक पराक्रमाचे प्रदर्शन असोत, सामूहिक स्पर्धा असोत किंवा सण आणि विधी असोत, प्रत्येक शक्यता हडप्पा शहराला एक दोलायमान सामाजिक जग म्हणून दाखवते. आता हडप्पा सभ्यता केवळ विटा, नाले, सील आणि व्यापार नेटवर्कवरूनच नव्हे, तर तिथे राहणाऱ्या लोकांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातूनही समजून घेणे आवश्यक आहे.

'स्टेडियम' शब्दाची मर्यादा

ढोलावीरा मैदानाला 'जगातील पहिले स्टेडियम' म्हणून घोषित करणे नक्कीच मोहक आहे, परंतु ऐतिहासिक दृष्टिकोनातून ते अकालीच ठरेल. असा दावा तेव्हाच केला पाहिजे, जेव्हा आमच्याकडे त्याच्या विशिष्ट क्रीडा वापराचे पुरेसे पुरावे असतील. उपलब्ध पुरावे अद्याप कोणत्याही एका वापरास निर्णायकपणे सिद्ध करीत नाहीत. 'स्टेडियम-समान सार्वजनिक संकुल' हा अधिक योग्य शब्द आहे. यातून एकाच वेळी दोन महत्त्वाच्या गोष्टी समोर येतात.

प्रथम, कॅम्पसमध्ये मोठ्या सामुदायिक कार्यक्रमांची आणि शारीरिक क्रियाकलापांची वास्तविक क्षमता होती. दुसरी, तिची भूमिका बहुद्देशीय होती. पुरातत्त्वशास्त्रात अशी सावधगिरी ही एक कमकुवतपणा नाही, परंतु विश्वासार्ह व्याख्याची कोनशिला आहे. ढोलावीराचे महत्त्व हे काही आधुनिक संस्थानिकांची प्राचीन प्रतिकृती असल्याचे सिद्ध करण्यात आले नाही. त्याचे खरे महत्त्व या वस्तुस्थितीत आहे की सुमारे चार हजार वर्षांपूर्वी एका शहराने सामूहिक क्रियाकलापांसाठी एवढी मोठी आणि सुव्यवस्थित सार्वजनिक जागा विकसित केली होती. तत्कालीन शहरी गरजा आणि नागरी विचारसरणीचे हे एक विलक्षण उदाहरण आहे.

भारतीय परंपरांमध्ये संभाव्य अनुनाद

नंतरच्या भारतीय साहित्यात, कुस्ती, धनुर्विद्या, गदा-लढाई, रथ-शर्यती आणि युद्ध हे शारीरिक सामर्थ्य, शिस्त, नेतृत्व आणि शौर्य यांच्याशी जोडले गेले. ऋग्वेदात घोडेस्वार, वेग आणि रथ यांचे अनेक संदर्भ आहेत. महाभारत आणि रामायणात शारीरिक क्षमता हा शौर्य आणि प्रतिष्ठेचा एक महत्त्वाचा पैलू आहे.

नंतरच्या काळात गावातील मैदाने, आखाडे, मंदिराचे प्रांगण, जत्रे आणि उत्सवाची ठिकाणे ही सामाजिक संवाद आणि शारीरिक क्रियाकलापांची केंद्रे बनली. तथापि, ढोलावीराचे मैदान आणि यानंतरच्या परंपरा यांच्यात थेट ऐतिहासिक वंश प्रस्थापित करणे योग्य होणार नाही. तरीही भारतीय उपखंडातील सार्वजनिक जीवन, समुदायाचा सहभाग आणि भौतिक संस्कृती यांच्या दीर्घकालीन अभ्यासाच्या संदर्भात ते पाहता येतात. हा दृष्टिकोन आपल्याला पुरातत्त्वीय पुराव्यांचा आदर करताना शारीरिक शिक्षण, शिस्त, धैर्य आणि सामूहिकता यांसारख्या मूल्यांच्या ऐतिहासिक उपस्थितीचा विचार करण्यास अनुमती देतो.

मूक सभ्यता वाचण्याचे आव्हान

हडप्पा संस्कृतीची लिपी अद्याप निर्विवादपणे उलगडलेली नाही. त्यामुळे ढोलावीरा मैदानच त्याच्या वापराचा इतिहास सांगू शकत नाही. त्याची रचना, प्रवेश मार्ग, पृष्ठभागावरील संभाव्य पोशाख, पुरातन वास्तूंचे वितरण आणि सभोवतालची रचना आपल्याला त्याचा भूतकाळ समजून घेण्याचे संकेत देतात. भविष्यात, सूक्ष्म अवकाशीय अभ्यास, पोशाख पद्धतींचे विश्लेषण आणि विविध पुरातन वास्तूंच्या स्थितीचा वैज्ञानिक अभ्यास या कॉम्प्लेक्सच्या क्रियाकलापांना स्पष्ट करू शकतात. तोपर्यंत संतुलित निष्कर्ष असा आहे की, ढोलावीरा हे एक असाधारण, सुव्यवस्थित आणि बहुउद्देशीय नागरी संकुल होते, जेथे मोठ्या गटांना एकत्र जमू शकते आणि जेथे धार्मिक विधी, उत्सव, सार्वजनिक प्रदर्शने आणि शक्यतो क्रीडा क्रियाकलाप होत असत.

नागरी संदेश

ढोलावीरा मैदानाचे सर्वांत मोठे महत्त्व हे आहे की, सुमारे चार हजार वर्षांपूर्वी एका शहराने एवढी मोठी आणि सुव्यवस्थित जागा सामूहिक उपक्रमांसाठी राखून ठेवली होती. उपलब्ध पुराव्याच्या आधारे हे प्राचीन नगर नियोजनात सार्वजनिक, समुदाय आणि शक्यतो शारीरिक क्रियाकलापांसाठी राखून ठेवलेल्या जागेचे एक उल्लेखनीय उदाहरण मानले जाऊ शकते. आज आधुनिक शहरांमधील मोकळ्या सार्वजनिक जागा सतत आकुंचन पावत असताना ढोलावीरा आपल्याला आठवण करून देतो की शहर हे केवळ घरे, बाजारपेठा आणि प्रशासकीय इमारतींनी बनलेले नसते. दोलायमान शहराला अशा ठिकाणांचीही गरज असते जिथे लोक एकत्र येऊ शकतात, शारीरिक हालचालींमध्ये सहभागी होऊ शकतात आणि सामायिक अनुभव तयार करू शकतात. ●●●

(पांचजन्यवरून साभार)

चिंतन

अभय कुमार

केरळच्या कांथापुरम गटाच्या आदेशावर राहुल गांधी मौन का?

महिलांना घरात बंदिस्त ठेवा

केरळची आघाडीची सुन्नी संघटना समस्थ केरळ जमियातुल उलामाने (कंथापुरम गट) मुस्लिम महिलांना अनोळखी पुरुषांसोबत सार्वजनिक व्यासपीठ शेअर करण्यापासून परावृत्त करण्याचे निर्देश दिले आहेत. महिलांची सार्वजनिक उपस्थिती इस्लामिक परंपरेच्या विरोधात असून, ती घरापुरती मर्यादित असावी, असे संघटनेच्या नेत्यांनी सांगितले.

संघटनेचे अध्यक्ष ई. सुलेमान मुसलियार आणि सरचिटणीस कांथापुरम एपी. अबुबकर मुसलियार यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महिलांनी पुरुषांसोबत व्यासपीठ शेअर करणे किंवा सार्वजनिक ठिकाणी अनोळखी पुरुषांमध्ये उपस्थित राहणे इस्लामिक परंपरेच्या विरोधात आहे.

राहुल गांधींचे दुटप्पी चरित्र उघड

हे निर्देश समोर आल्यानंतर केरळमध्ये महिलांचे हक्क, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि लैंगिक समानता या संदर्भात नवी राजकीय आणि सामाजिक चर्चा सुरू झाली आहे. विरोधी पक्षांनी या आदेशाचे पुराणमतवादी आणि महिलांच्या घटनात्मक अधिकारांच्या विरोधात वर्णन केले आहे. या मुद्द्यावर राहुल गांधींनी मौन बाळगल्याने त्यांचे खरे चारित्र्य आणि रंगरूप समोर आले आहे.

या विधानानंतर केवळ केरळ राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशातील राजकीय वर्तुळात आणि समाजातील विविध घटकांमधून आणि राजकीय पक्षांमधून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या निर्देशावर केरळच्या महिला आणि बालविकास मंत्री बिंदू कृष्णा यांनी जोरदार टीका केली. त्यांनी सांगितले की, धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार हा संविधानाने कोणत्याही नागरिकाला दिलेल्या समानतेच्या आणि प्रतिष्ठेच्या मूलभूत अधिकारांपेक्षा वर असू शकत नाही. त्यांनी इशारा दिला की, अशा सूचना स्त्रियांना मागे ढकलतात, जे आधुनिक समाजात स्वीकारले जाऊ शकत नाही.

आणि डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया यांसारख्या तथाकथित पुरोगामी युवा संघटनांनी या आदेशाचे वर्णन पूर्णपणे महिलाविरोधी आणि आधुनिक समाजाच्या विचारांच्या पलीकडे आहे. भारताच्या पहिल्या महिला सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती एम. फातिमा बीवी यांसारख्या केरळमधील महान महिलांचे उदाहरण देत त्यांनी सांगितले की, केरळच्या

की, हे निर्देश केवळ मुस्लिमांसाठी आचारसंहिता आहे, ज्यांना धार्मिक नियम आणि सीमांमध्ये त्यांच्या परंपरांचे पालन करायचे आहे. काँग्रेस पक्ष अजूनही या मुद्द्यावर मौन बाळगून आहे. कारण सध्या केरळमध्ये काँग्रेस पक्ष आणि युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट सरकार सत्तेवर आहे आणि इंडियन युनियन मुस्लिम लीग त्यात महत्त्वाचा भागीदार आहे.

इंडियन युनियन मुस्लिम लीग सध्या केरळ सरकारमध्ये पाच मंत्र्यांसह आपल्या राजकीय कारकिर्दीत काँग्रेसच्या बरोबरीने काम करीत आहे. काँग्रेस पक्षाने या मुद्द्यावर तोंड उघडल्यास आययूएमएल्गच्या राजकीय रोषाला सामोरे जावे लागू शकते. याशिवाय उत्तरप्रदेश आणि उत्तराखंडमध्ये विधानसभा निवडणुका आहेत, त्यात काँग्रेस पक्षाला मुस्लिम मतदारांकडून मोठ्या आशा आहेत.

केरळची गणना देशातील सर्वाधिक शिक्षित राज्यांमध्ये केली जाते. असे असूनही

केरळ भाजपा आणि पक्षाच्या इतर केंद्रीय नेत्यांनी या निर्देशाला महिलांच्या घटनात्मक अधिकारांवर थेट हल्ला म्हटले आहे. भाजपाने या मुद्द्यावर काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या मौनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत, याला निवडक स्त्रीवाद आणि मतपेढीचे राजकारण म्हटले आहे. स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया महिलांनी न्यायव्यवस्था, राजकारण आणि विज्ञान या क्षेत्रांत अभूतपूर्व प्रगती केली आहे.

कट्टर मुस्लिम सुन्नी युथ विंगची भूमिका

दुसरीकडे, सुन्नी युथ विंगसारख्या संघटना आणि पुराणमतवादी विचारवंतांनी या निर्णयाचा बचाव केला आहे, असा दावा केला राज्यात अशा धार्मिक सूचना लागू झाल्यानंतर, धार्मिक आचारसंहिता आणि सनातनी परंपरा नागरिकांच्या संवैधानिक स्वातंत्र्य आणि स्त्री-पुरुष समानतेवर कितपत परिणाम करू शकतात, यावर वादविवाद तीव्र झाला आहे. ●●●

(पांचजन्यवरून साभार)

अर्थनीती

डॉ. मंगला मिरासदार

समाजाबाबत अर्थशास्त्राची भूमिका

समाजिक जीवन राज्यशास्त्र या ग्रंथात समाज व सामाजिक रचना हा विषय प्रामुख्याने येत नाही हे खरे; पण राजकीय जीवनाचे अस्तित्व समाजावरच अवलंबून असते, राज्यकर्त्याला समाजाचा विचार करावाच लागतो.

समाजाची रचना राज्यशासनाने निर्माण केली नाही व त्या व्यवस्थेत बदल करण्याचा अधिकारही राज्यकर्त्याला नसतो; त्या व्यवस्थेचे केवळ रक्षण करणे हेच त्याचे कर्तव्य सांगितले आहे.

मात्र, यासंदर्भात अर्थशास्त्राची भूमिका थोडी वेगळी आहे. वर्णाश्रमधर्माची प्राचीन चौकट अर्थशास्त्राने मान्य केली असली तरी व्यापक राज्यहिताच्या दृष्टीने त्यात काही बदल जाणवतात.

विशेषतः शूद्र वर्णाची कर्तव्ये सांगताना हा बदल जाणवतो! वार्ता (शेती, पशुपालन, व्यापार) व कारुकुशीलवकर्म (कारागिरी व ललितकला) या दोन गोष्टी या वर्णाकडे केवळ अर्थशास्त्रानेच सोपवल्या आहेत. उत्तम शेतीच्या वर्णनात व नवीन वसाहत करताना 'शूद्रकर्षकप्राय' म्हणजे या वर्णाची वस्ती जिथे जास्त असेल ते 'उत्तम जनपद' असे म्हटले आहे. तसेच मनोरंजनाच्या दृष्टीने ललितकलांची धुरा पण या वर्णाकडे आहे. या वर्णाला राज्याच्या आर्थिक धोरणाचा भक्कम स्तंभ मानून विशेष स्थान दिले आहे. हा दृष्टिकोन व्यापक राज्यहिताचा, दूरदृष्टीचा व तर्कशुद्ध आहे.

अर्थात, वर्णव्यवस्थेतले ब्राह्मणांचे स्थान कौटिल्याने नाकारले नाही पण त्यांची भलावणही केली नाही. कायद्याच्या पलीकडे जाऊन त्यांना स्वातंत्र्य दिलेले नाही. मात्र, वेदशास्त्रसंपन्न अशा क्षेत्रीय ब्राह्मणांचे काही अधिकार मान्य केले आहेत. उदाहरणार्थ : ऋत्विज, आचार्य, क्षेत्रीय, पुरोहित यांना दानरूपाने जमिनी द्याव्यात; त्यांना दंड व कर लावू नयेत व त्यांचे वाद वेदशास्त्रसंपन्न असतील तर हा अधिकार चालू ठेवावा; केवळ वारसाहक्काने नव्हे, हे मुद्दाम सांगितले आहे.

या स्थिर समाजखेरीज 'आटविक' म्हणजे जंगलात राहणाऱ्या समूहाचा निर्देश अर्थशास्त्रात आहे. सहा प्रकारच्या सैन्यबलात 'अटवी बल' म्हणजे जंगलातील लोकांच्या सैन्याचा उल्लेख आहे. हे लोक लढवय्ये व शूर असतात. शत्रूविरोधात राजाला हे सैन्य उपयोगी पडते. ते सीमा भागात असल्याने शत्रू सैन्याचा हल्ला परतवता येतो. मात्र, सामाजिक दृष्टीने शहरी व ग्रामीण प्रजेपेक्षा हे जंगली समूह वेगळे पडल्याचे दिसतात. त्यांना समजून वा सामावून घेण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसत नाही; मात्र आधुनिक काळात परिस्थिती बदलत असून त्यांच्यातील मुलांना शिक्षण देऊन सामाजिक प्रवाहात आणण्याचे प्रयत्न होत आहे.

स्त्री जीवन : प्राचीन समाजरचनेतील आश्रमव्यवस्थेत अर्थशास्त्राने गृहस्थाश्रमाला पहिले स्थान दिले आहे. कारण त्यावरच समाजजीवन सुरळीत चालू राहते. गृहस्थाश्रमाचे पहिले कर्तव्य आहे विवाह. प्राचीन विवाह प्रकारात विवाहशुल्काचा म्हणजे हुंड्याचा उल्लेख आहे. ही रुढी कौटिल्यास मान्य नसावी असे मानायला जागा आहे. तो म्हणतो, 'सर्व विवाह प्रकारांत आपल्या मुलीला (वधूला) खुशीने काही देऊ करण्यास प्रतिबंध नाही!'

म्हणजेच हुंडा न दिल्यास मुलीचा छळ या गोष्टींना वाव नसावा, असे कौटिल्याच्या विधानावरून वाटते.

स्त्रीधनावर स्त्रीचाच हक्क होता. त्यावर तिच्या पतीचाही हक्क नव्हता. स्त्रीधनाचा विनियोग ती आपल्या कुटुंबाच्या पालनपोषणासाठी तसेच संकटकाळात करू शकत होती. मात्र, स्त्रीने पुनर्विवाह केला तर आधीच्या स्त्रीधनावरचा तिचा हक्क संपतो.

विवाहाला संस्कार मानल्याने घटस्फोट कायदेशीर मानला नव्हता. तरी कारण योग्य असेल तर स्त्री विवाहबंधनातून मोकळी होऊ शकत होती. पतीची अधोगती, परदेशगमन, त्याने केलेला राजद्रोह, गर्भाधान संस्कारापूर्वीच प्रवासाला जाऊन तो परत न येणे या कारणासाठी न्यायाधीशांच्या निर्णयानुसार तिला दुसऱ्या विवाहास परवानगी होती. पती लांबच्या प्रवासास गेला असेल तर पत्नीने वर्षभर वाट पाहावी, असा नियम होता. 'नियोगा'ची (दीरापासून पुत्रप्राप्तीची) पद्धत होती.



विधवा स्त्रियाही समाजात मोकळेपणाने वावरू शकत व स्वतंत्रपणे राहू शकत. ही स्त्रीजीवनाची विशेष बाजू अर्थशास्त्रात दिसते. 'छंदव्यासिनी विधवा' म्हणजे स्वतंत्रपणे स्वेच्छेने राहणारी विधवा असा उल्लेख आढळतो तसेच 'आढ्य' म्हणजे श्रीमंत विधवा असाही उल्लेख अनेक ठिकाणी आला आहे.

'परिव्राजिल' म्हणजे 'फिरत्या संन्यासिनी' हा वर्गही दिसतो. विशेष म्हणजे राजशासनात गुप्तहेरांच्या कामगिरीसाठी या परिव्राजिकांचा उपयोग करून घेतला आहे. तिच्याबद्दल सांगताना अर्थशास्त्रात म्हटले आहे, ही परिव्राजिका म्हणजे ब्राह्मण विधवा असून संन्यासिनी असते. राजमहालात तिला मानाचे स्थान असून सर्वत्र तिला मुक्त प्रवेश असतो. नंतरच्या काळातील साहित्यातही या परिव्राजिका दिसतात. (उदाहरणार्थ : कालिदासाचे 'मालविकाग्निम्' हे नाटक). या परिव्राजिकांच्या वर्गात मोडणाऱ्या संन्यासिनी म्हणजे 'मुण्डा' (मुंडन केलेल्या) 'वृषली' म्हणजे धर्मरहित संन्यासिनी! त्यांच्या जनमानसातील आदराच्या आणि विश्वासाच्या स्थानामुळे गुप्तहेरांच्या प्रकारात त्यांचा समावेश आहे.

उद्योगधंद्यांमध्ये कापड उद्योग हा महत्त्वाचा होता. या उद्योगांचे वैशिष्ट्य म्हणजे ज्या स्त्रिया घराबाहेर पडू शकत नव्हत्या त्यांना या उद्योगातून घरपोच काम व रोजगार मिळत होता. विधवा. पंगु, स्त्रिया, कन्यावर, घर सोडलेल्या स्त्रिया, अंगमेहनत करणाऱ्या स्त्रिया, वेश्यांच्या माता, राजवाड्यातील वृद्ध दासी, ज्यांची देवळातली सेवा बंद झाली असून देवदासी यांच्याकडून शिकर, वृक्षाची साल, कापूस अंबाडी यांचे सूत कातून घेतले जाई. या स्त्रियांपैकी कोणी स्वतःच सुताच्या गिरणीत येऊ शकत असतील तर माणसांची वर्दळ सुरू होण्यापूर्वी भल्या पहाटे माल व मजुरी यांची देवघेव केली जाई. सुताची परीक्षा करण्यापुरताच दिवा असे. तेथील अधिकाऱ्याने स्त्रीच्या तोंडाकडे पाहिल्यास व कामाव्यतिरिक्त संभाषण केल्यास त्या अधिकाऱ्यालाच शिक्षा होत असे!

समाजात आणखी एक वर्ग होता तो म्हणजे गाणिकांचा. यांच्यावर राज्याची देखरेख व नियंत्रण होते.

अर्थशास्त्रात सार्वजनिक खाद्यगृहांचाही उल्लेख आहे. शाकाहारी व मांसाहारी अशी दोन्ही प्रकारची खाद्यगृहे होती. विशेष म्हणजे पदार्थ टिकविण्याच्या पाककृती दिल्या आहेत. गंमतीची गोष्ट म्हणजे सुकवलेले मासे किंवा मांसाचा समावेश 'शाकवर्गात' (भाज्यांमध्ये) केला आहे.

'सुनाध्यक्ष' हा खाटिक खान्यावरचा अध्यक्ष असून अवैध कत्तल करण्यावर त्याचे नियंत्रण होते. मद्याचे उत्पादन व विक्री यांच्या नियंत्रणासाठी 'सुराध्यक्ष' होता. विविध प्रकारची मद्ये कोणकोणत्या पदार्थांपासून बनवली जातात याचेही वर्णन अर्थशास्त्रात आहे. तांदळापासून केली जाणारी मेदक, बार्लीच्या पीठापासून प्रसन्ना, उसाच्या रसापासून आसव, मैरेय, द्राक्षापासून मधु कपिशणयन व हारहूरक इत्यादी. अन्त्यविधीसाठी आलेल्या लोकांना मद्य देण्याची पद्धत सर्वसामान्यांमध्ये प्रचलित होती.

धार्मिक जीवनात विविध देवतांच्या मंदिरांचा उल्लेख आढळतो. देवतांच्या नावांमध्ये अपराजित, अप्रतिहत, जयंत, वैजयंत अशी वेगळी नावेही दिसतात. ग्रामाच्या वेशीवर चार दिशांना ब्रह्मज्ञ, इंद्र, यम, सेनापती (स्कंद) अशा अधिष्ठादी देवताही दिसतात.

देवालयांची स्वतःची मालमत्ता असे. त्यात मूर्ती, गामी, सेवक, जमीन, सोने, रत्ने, धान्य, नगद रक्कम यांचा समावेश होता. देवालयांच्या मालमत्तेचे रक्षण ग्रामवृद्धांनी करावे, अशी प्रथा होती. तसेच देव, ब्राह्मण, तपस्वी, स्त्रिया, अज्ञान मुले, अनाथ, वृद्ध योगी हे स्वतः तक्रार करू शकत नसतील तर न्यायाधीशांनी आपण होऊन त्यांच्या तक्रारीची चौकशी करावी व त्यांच्या तक्रारी फेटाळून लावू नये, असे बंधन न्यायाधीशांवरही होते. देवालयांच्या व्यवहाराकडे, मालमत्तेकडे व विश्वस्तांकडे लक्ष ठेवण्यासाठी 'देवताध्यक्ष'ही होता.

राज्याचे हित हे अर्थशास्त्रात धार्मिक भावनेपेक्षा व श्रद्धेपेक्षा जास्त महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे राज्याच्या संकटात वा आणिबाणीच्या प्रसंगात देवालयांचे द्रव्य उपयोगात आणण्याचा अधिकार राजाला होता. प्राचीन देवालये ही उत्सवाची केंद्रे होती. यात्रा, विविध देवतांचे उत्सव यानिमित्ताने लोक एकत्र येत. मात्र या यात्रा, उत्सव यांच्यासह देवालयांचा उपयोग राज्याच्या संकटकाळात करण्याचे धोरण होते. उदाहरणार्थ एखादी देवता रात्रीतून प्रकट झाली असे भासवून तिथे उत्सवाची योजना करून द्रव्य सरकारने खजिन्यात जमा करून त्याचा विनियोग संकट निवारणासाठी म्हणजे प्रजेसाठीच होत होता, हे विशेष.

मनोरंजनाचा सामान्य प्रकार म्हणजे 'प्रेक्षा' किंवा नाटक हा होता. 'रंगोपजीविन' किंवा 'रंगोपजीविनी' असा पुरुष-स्त्री नटांचा उल्लेख आढळतो. त्यात भाग घेणाऱ्या नट, नर्तक, गायक, वादक, तालावचर यांचा वारंवार उल्लेख आहे.

नवीन वस्ती वसवताना तिथे मनोरंजनासाठी प्रेक्षागृहे बांधू नयेत असा नियम होता. याचे प्रमुख कारण म्हणजे नट, नर्तक वगैरे मंडळींनी शेतीच्या कामात अडथळा आणू नये हे होते. तमाशा, फडाचा मुक्काम असला की शेतीची वा अन्य कामे टाकून देऊन लोक कसे तिकडे धावतात, हे चित्रीत करणारा 'पिंजरा' हा सिनेमा अनेकांना आठवत असेल! ●●●

धर्म-संस्कृती

महक सिंह

मथुरा ते गोकुळ

आज मथुरा आणि आसपासचा ब्रज प्रदेश केवळ धार्मिक पर्यटनाचे केंद्र नाही. हे ब्रज संस्कृतीचे जिवंत जग आहे. इथे कृष्णाच्या नावाशी संबंधित गाणी, भजने, लोककथा, सण आणि परंपरा पिढ्यानपिढ्या चालतात.

मथुरेच्या गल्लीबोळात फिरताना वेळ थोडा थांबल्यासारखा वाटतो. कुठे मंदिराची घंटा ऐकू येते, कुठे राधे-कृष्णाचा नामजप, तर कुठे यमुनेच्या तीरावर बसलेला भक्त डोळे मिटून श्रीकृष्णाचे स्मरण करताना दिसतो. ही अशी भूमी आहे, जी शत-कानुशतके श्रीकृष्णाच्या जन्मस्थानाशी आणि त्यांच्या बालपणीच्या करमणुकीशी जोडलेली आहे. श्रीकृष्णाच्या जन्माची कथा ही केवळ धार्मिक कथा नाही. एका नवजात बाळाला कंसाच्या अत्याचारापासून वाचविण्यासाठी मध्यरात्री मथुरेहून गोकुळला नेले जाते, त्या प्रवासाचीही ही कथा आहे. या कथेत तुरुंग आहे, यमुना आहे, वसुदेवांचा खडतर प्रवास आहे आणि गोकुळाचे जग आहे, जिथे कृष्णाने बालपणीचे दिवस घालवले.

आज मथुरेहून गोकुळकडे जाताना वाटेत अनेक ठिकाणे दिसतात, जी स्थानिक परंपरा आणि धार्मिक श्रद्धांशी संबंधित आहेत. तथापि, आजचा भूगोल आणि प्राचीन कथांचा भूगोल पूर्णपणे एकसारखा समजणे नेहमीच योग्य नाही. तरीही या ठिकाणांची धार्मिक ओळख आणि त्यांच्याशी निगडित परंपरा आजही लोकांच्या मनात तोच आदर कायम ठेवतात.

श्रीकृष्ण जन्मस्थान

श्रीकृष्णाच्या जन्माची कथा मथुरेपासून सुरू होते. मान्यतेनुसार, मथुरेत देवकी आणि वासुदेव यांच्या पोटी श्रीकृष्णाचा जन्म झाला. त्यावेळी मथुरेवर देवकीचा भाऊ कंसाचे राज्य होते. देवकीच्या आठव्या अपत्यामुळे कंसाचा अंत होईल, अशी आकाशवाणी झाली होती. या भीतीमुळे कंसाने देवकी आणि वासुदेव यांना पकडले. आज मथुरेतील कृष्णजन्मभूमी परिसर हे या कथेचे मुख्य केंद्र आहे. विशेषतः जन्मा-ष्टमीनिमित्त हा परिसर भाविकांनी फुलून जातो. इथले सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे कृष्णाच्या जन्माची कथा केवळ पुस्तकांतच नाही, तर ती मंदिरे, पूजा पद्धती आणि लोकांच्या श्रद्धेतून दिसते.

कंसाचा तुरुंग

कथेनुसार, देवकी आणि वासुदेव यांना ज्या तुरुंगात ठेवण्यात आले होते, त्या तुरुंगात मध्यरात्री श्रीकृष्णाचा जन्म झाला. जेव्हा कंसाला देवकीच्या आठव्या अपत्याचा जन्म झाल्याची बातमी मिळाली, तेव्हा तो तिला मारण्यासाठी तुरुंगाच्या दिशेने निघाला. पण, कृष्णाच्या जन्माबरोबरच परिस्थिती बदलली आणि वासुदेवांना कृष्णाला गोकुळात घेऊन जाण्याची संधी मिळाली. आज कृष्णजन्मभूमी क्षेत्राशी निगडित असलेल्या या ठिकाणी कारागृहाची स्मृती धार्मिकदृष्ट्या खूप महत्त्वाची आहे. येथे येणाऱ्या भाविकांना ती गोष्ट आठवते, ज्यात एक बाप आपल्या नवजात मुलाला वाचविण्यासाठी रात्री निघतो. असे मानले जाते की, वासुदेवांनी बालकृष्णाला एका टोपलीत ठेवले आणि रात्री मथुरेहून गोकुळच्या दिशेने निघाले. बाहेर मुसळधार पाऊस पडत होता. वाटेत यमुना नदी आली. कथेत असे सांगितले आहे की, यमुनेचे पाणी जास्त होते, परंतु वासुदेवांनी कृष्णाला डोक्यावर उचलून नदी पार केली. ही घटना आजही कृष्णभक्तांच्या भावनेने स्मरणात आहे. आपल्या मुलाला वाचवण्यासाठी अंधारात रात्री नदी ओलांडणारा एक पिता, हे दृश्य कृष्णाची कथा केवळ धार्मिकच नाही तर मानवतेलाही बनवते. कथेनुसार, शेषनागने बाळकृष्णाला त्याचा फड पसरवून पावसापासून वाचवले. या कारणास्तव कृष्णजन्माष्टमीच्या कथेत पाऊस, यमुना आणि शेषनाग यांचा संदर्भ विशेष महत्त्वाचा आहे.

यमुना कथा

यमुना हा या संपूर्ण कथेचा महत्त्वाचा भाग आहे. मथुरा आणि गोकुळ दोन्ही यमुना क्षेत्राशी जोडलेले आहेत. आजही यमुनेच्या तीरावर उभे राहून भक्तांना ती कथा आठवते, ज्यात वासुदेव बाळकृष्णासह नदी पार करतात. मात्र, आजचे नदीचे मार्ग, जुने नदीचे मार्ग आणि प्राचीन काळातील भूगोल बदलला आहे. त्यामुळे आजच्या नकाशावर कथेत वर्णन केलेला अचूक मार्ग निश्चित करणे कठीण आहे. असे असले तरी, मथुरा आणि गोकुळमधील यमुनेचे अस्तित्व या कथेला निश्चितच भौगोलिक आधार देते. त्यामुळे यमुना ही फक्त एक नदी राहून राहते. कृष्णभक्तांसाठी ती त्या रात्रीची साक्षीदार बनते, जेव्हा कृष्णाला गोकुळात नेण्यात आले.

गोकुळ

वासुदेवांनी बाळकृष्णाला गोकुळातील नंद आणि यशोदा यांच्या घरी आणले, ही धारणा कृष्णाच्या बालपणीच्या करमणुकीच्या सुरुवातीशी संबंधित आहे. गोकुळचे नाव येताच कृष्णाच्या बालपणाची आठवण येते. लोणी, गोपी, गायी, बासरी आणि खोडकर बालक कृष्णाच्या प्रतिमा मनात उमटू लागतात. आजचे गोकुळ हे मथुरेच्या आसपास यमुना प्रदेशात स्थित एक प्रमुख धार्मिक स्थळ आहे. येथील अनेक मंदिरे आणि धार्मिक स्थळे कृष्णाच्या बालपणीच्या मनोरंजनाची आठवण करून देतात. जन्माष्टमी, नंदोत्सव आणि इतर धार्मिक प्रसंगी येथे विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात. गोकुळचे वैशिष्ट्य म्हणजे, येथे कृष्णाचे स्मरण केवळ देवासारखेच नाही तर लहान मुलाच्या रूपात केले जाते- जो लोणी चोरतो, आई यशोदेची टर उडवतो आणि आजूबाजूच्या लोकांच्या जीवनात आनंद आणतो.

नंद भवन आणि महावन

गोकुळ आणि त्याच्या आजूबाजूचा परिसर कृष्णाच्या संगोपनाच्या आख्यायिकेशी संबंधित आहे. नंद भवन हे परंपरेने नंद बाबा आणि यशोदा यांच्या घराशी जोडलेले आहे. येथे येणारे भाविक बाळकृष्ण आणि माता यशोदा यांचे प्रेम अनुभवण्याचा प्रयत्न करतात. कृष्णाच्या बालपणीच्या करम-णुकीशी संबंधित धार्मिक परंपरेत जवळचे महावन देखील महत्त्वाचे मानले जाते. महावन प्राचीन ब्रज प्रदेशाच्या आठवणींशी जोडलेले दिसते. कृष्णाच्या बालपणीच्या कारनाम्यांच्या कथा इथल्या रस्त्यांवर आणि मंदिरांमध्ये ऐकायला मिळतात. यामुळेच मथुरेला येणारे अनेक भाविक केवळ जन्मस्थानापुरते मर्यादित न राहता गोकुळ आणि महावनलाही भेट देतात. कृष्णाच्या कथेत त्यांचा मोठा भाऊ बलराम याचे स्थानही खूप महत्त्वाचे आहे. ब्रज प्रदेशात बलदेव, ज्याला दौजी देखील म्हणतात, हे बलरामावरील श्रद्धेचे मुख्य केंद्र आहे. बलदेव परिसरात असलेले दौजी मंदिर धार्मिक दृष्टि-कोनातून अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. येथे बलरामांची विशेष भक्तिभावाने पूजा केली जाते. कृष्णकथा समजून घेण्यासाठी बलरामाचा संदर्भही महत्त्वाचा आहे, कारण कृष्णाच्या बालपणीच्या जीवनाशी संबंधित अनेक कथांमध्ये बलराम त्यांच्यासोबत दिसतात. ब्रजच्या लोकपरं-परेत दोन भावांचे नाते आजही जिवंत आहे.

आजही ही ठिकाणे खास का आहेत?

आज मथुरा आणि आसपासचा ब्रज प्रदेश केवळ धार्मिक पर्यटनाचे केंद्र नाही. हे ब्रज संस्कृतीचे जिवंत जग आहे. इथे कृष्णाच्या नावाशी संबंधित गाणी, भजने, लोककथा, सण आणि परंपरा पिढ्यानपिढ्या चालतात. मथुरेत जन्माष्टमीला कृष्ण जन्माचा उत्सव साजरा केला जातो. गोकुळमध्ये नंदोत्सवाची परंपरा दिसून येते. महावन आणि बलदेव येथेही कृष्ण आणि बलरामाशी संबंधित धार्मिक कार्ये होतात. या ठिकाणांना भेट देणारा माणूस केवळ मंदिरच पाहत नाही, तर एक संस्कृतीही अनुभवतो, ज्यात कृष्ण अजूनही कुटुंबातील मुलासारखा आहे- कुठे कान्हा, कुठे लाडू गोपाळ, कुठे नंदलाल तर कुठे दौजीचा धाकटा भाऊ.

वंदे मातरम्... प्रश्न फक्त गाण्याचा नव्हे, राष्ट्रीय दृष्टीचा!

(शेष पान I वरून)

'वंदे मातरम्' हे एकतेचे सूत्र देश विसरला नाही. त्याचा देशाने गौरव केला.

२०२६ मध्ये या प्रवासाचा एक नवीन अध्याय जोडला गेला. गृह मंत्रालयाने राष्ट्रगीतासाठी प्रथम तपशीलवार अधिकृत व्यवस्था जारी केली आणि सरकारी समारंभात सर्व सहा कडवी असलेल्या पूर्ण फॉर्ममध्ये गाण्याची तरतूद केली. यानंतर संसदेने राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंधक कायद्यात सुधारणा मंजूर केल्या. ६ ऑगस्ट २०२६ रोजी राष्ट्रपतींच्या मान्यतेनंतर हा कायदा बनवण्यात आला आणि आता राष्ट्रगीत गायन मुद्दाम थांबवणे किंवा व्यत्यय आणणे हे देखील त्याच कायदेशीर तरतुदींच्या अधीन आले, ज्यात राष्ट्रगीत आधीपासून होते. कायद्यानुसार गायन थांबवणे किंवा अडथळा आणणे हा गुन्हा आहे. राजकीय पक्षाने त्याच्या खाजगी कार्यक्रमात दोन कडवी गाणे हे आपोआप फौजदारी तरतुदीचे उल्लंघन होत नाही. परंतु राष्ट्रीय धोरण, अधिकृत प्रोटोकॉल आणि १९३७ चे पक्ष धोरण यांच्यात वैचारिक संघर्ष नक्कीच निर्माण होतो. त्यामुळे राज्यघटनेच्या आदराचाही प्रश्न आहे. लोकशाहीत संसदेने केलेल्या कायद्यावर टीका करणे हा संविधानाचा अपमान नाही. सरकारवर टीका करणे घटनाबाह्य नाही. निवडणूक आयोग, राज्यपाल, तपास यंत्रणा किंवा इतर कोणत्याही संस्थेच्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे हाही नागरी आणि राजकीय अधिकार आहे. संविधानानेच मतभेदांना वाव दिला आहे. पण प्रश्न तेव्हा निर्माण होतो, जेव्हा संविधानाला केवळ राजकीय प्रतीक बनवले जाते. हातात संविधानाची छोटीशी प्रत असू शकते, भाषणात संवैधानिक संस्थांना आवाहन असू शकते, परंतु ज्या निर्णयाला राजकीय संमती नाही, तो निर्णय ताबडतोब बेकायदेशीर, पक्षपाती किंवा अस्वीकार्य असल्याचे घोषित केले पाहिजे. घटनावाद म्हणजे संस्थांची पूजा करणे असा अर्थ नाही, तर त्यांच्या सोयीनुसार त्यांची वैधता ठरवणे देखील घटनात्मक नाही.

काँग्रेसने अलिकडच्या वर्षांत संविधानाला आपल्या राजकारणाचे मुख्य प्रतीक बनवले आहे. हा त्यांचा लोकशाही अधिकार आहे, पण नंतर त्यांच्याकडून उच्च दर्जाच्या भूमिकांची अपेक्षा केली जाईल. १९३७ च्या पक्ष कार्यकारिणीचा निर्णय १९५० च्या संविधान सभेच्या राष्ट्रीय भावनेच्या आणि २०२६ च्या सध्याच्या वैधानिक व्यवस्थेच्या वर कसा असू शकतो, हे त्यांना स्पष्ट करावे लागेल. आपल्या कार्यक्रमात फक्त दोनच कडवी गाणार असा काँग्रेसचा तर्क असेल तर तो पक्षाचा निर्णय आहे.

इथे महात्मा गांधींचा संदर्भ अधिक मनोरंजक आहे. गांधींना 'वंदे मातरम'मध्ये देशभक्तीची प्रेरणा दिसली. ते म्हणाले, रामराज्याचा अर्थ धार्मिक राज्य नसून, न्याय आणि नैतिक राज्य असा होता. त्यांनी भारतीय भाषा आणि हिंदुस्थानी यांच्या प्रश्नाला राष्ट्रीय स्वाभिमानाशी जोडले. गोसेवा ही त्यांच्यासाठी हिंदू धर्मावर गाढ श्रद्धा होती, परंतु त्यांनी दुसऱ्या समुदायावर बळाचा वापर करण्यास विरोध केला. गांधी समजून घ्यायचे असतील तर पूर्ण गांधी वाचावे लागतील. जेव्हा राजकीय पक्ष गांधींच्या विचारांचे केवळ सोयीचे भाग निवडतात तेव्हा समस्या उद्भवते.

म्हणूनच काँग्रेसपुढे खडतर प्रश्न आहे आणि तो असा की, गांधी ही कल्पना आहे की केवळ राजकीय भांडवल? 'वंदे मातरम'वर गांधींनी दिलेली सावधगिरी आठवत असतानाच १९०५ मध्ये याच गाण्याचे गांधींनी मनापासून केलेले कौतुकही काँग्रेसला आठवायला हवे. एखाद्या महापुरुषाचे चित्र कार्यालयात टांगणे सोपे आहे, पण त्यांच्या विचारांची पूर्णता स्वीकारणे कठीण आहे. गांधींच्या जिवंत विचारांपेक्षा चलनी नोटांवरचे गांधीच काँग्रेसला आवडत नाहीत ना? हे वाक्य नुसते उपरोधिक राहता कामा नये. त्याचा अर्थ असा की, महापुरुष हे राजकीय चलन नसतात. गरजेनुसार त्यांची पूर्तता करता येत नाही. गांधी हा काँग्रेसचा वारसा असेल तर त्यांचे विचारही प्रश्न निर्माण करतील - 'वंदे मातरम'वर, स्वदेशीवर, सत्तेच्या नैतिकतेवर आणि भारताच्या सांस्कृतिक आत्म्यावरही.

आज 'वंदे मातरम'ला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याचा हा प्रसंग महत्त्वाचा आहे. जुन्या वादाची पुनरावृत्ती करण्याची ही वेळ नाही. भारताने २०२५-२६ मध्ये देशव्यापी कार्यक्रम सुरू केले. शाळा, महाविद्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, सांस्कृतिक संस्था, सुरक्षा दल आणि नागरी संघटना याच्याशी जोडल्या गेल्या. ऑगस्ट २०२६ मध्ये स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावर प्रथमच 'वंदे मातरम'चे संपूर्ण सहा कडवी गायिली गेली. देशभ-रातील ३४३ प्रमुख ठिकाणी लष्करी आणि सुरक्षा दलांचे बँड कार्यक्रम झाले. हा केवळ सरकारी कार्यक्रम नव्हता, तर राष्ट्रीय स्मृती नव्या पिढीपर्यंत नेण्याचा प्रयत्न होता.

या बदलाची चिन्हे फक्त दिल्लीपुरती मर्यादित नाहीत. श्रीनगरमध्ये विद्यार्थ्यां-सोबत कार्यक्रम झाले. ऑगस्ट २०२६ मध्ये लाल चौकात शालेय विद्यार्थ्यांची तिरंगा यात्रा निघाली. तोच लाल चौक, जिथे १९९२ च्या एकता यात्रेत तिरंगा फडकवला गेला होता व तो सुरक्षा आणि दहशतवादाच्या आव्हानाशी संबंधित राष्ट्रीय मुद्दा बनला होता आणि ज्या व्यवस्थेत नरेंद्र मोदी सक्रिय होते. आज जेव्हा शाळकरी मुले तिरंगा घेऊन बाहेर पडतात, तेव्हा हे दृश्य राजकारणापेक्षा मोठे प्रतीक बनते. कधी कधी इतिहासाचे चाक कोणत्या दिशेला वळते हे समज-ण्यासाठी एक चित्र पुरेसे असते.

अरुणाचल प्रदेशातील शाळांमध्ये 'वंदे मातरम'ची दीडशे वर्षे साजरी करण्यात आली. लडाखमधील चुशूल येथील रेझांगला युद्ध स्मारक येथे विद्यार्थी

आणि नागरिकांनी एकत्रितपणे त्याचे गायन केले. जम्मू-काश्मीरमधील शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यक्रम घेण्यात आले.

'वंदे मातरम'चा खरा अर्थ समजून घेतला पाहिजे. ते देशाचे गीत आहे. ती भारतमातेची आराधना आहे. ते कोणत्याही मुस्लिमाविरुद्ध गाणे नाही, ती कोणत्याही हिंदू राजकीय पक्षाची मालमत्ता नाही. ती काँग्रेसची मालमत्ता नाही आणि भाजपा किंवा इतर कोणत्याही पक्षाचा वैयक्तिक वारसाही नाही. त्याची मुळे भारतात आहेत, ज्यामध्ये भूमीला माता मानले जात होते आणि राष्ट्र ही केवळ शासन व्यवस्था मानली जात नव्हती.

भारताला आपली विविधता वाचवायची असेल तर त्याने आपल्या सांस्कृतिक स्मृतीपासून दूर जाणे योग्य नाही. सर्वांना त्याचा व्यापक अर्थ सांगावा लागेल. मातृभूमीबद्दलची कृतज्ञतेची भावना भारतातील सर्व प्रकारच्या प्रति-स्पर्ध्यांमध्ये एक समान आधार बनू शकते. राष्ट्रवादाच्या भारतीय कल्पनेच्या यशाची गुरुकिल्ली अशी आहे की ती उपासना पद्धतींच्या समानतेची मागणी करत नाही, परंतु मातृभूमीप्रति निष्ठेची समानता निश्चितपणे मागते.

या संपूर्ण वादात काँग्रेसलाही संधी आहे. त्या पक्षाची इच्छा असल्यास, ऐतिहासिक परिस्थितीच्या संदर्भात १९३७ मधील आपली भूमिका स्पष्ट करून आजच्या भारताशी तो पक्ष एक नवीन संवाद सुरू करू शकतो किंवा १९३७ च्या ठरावाला अपरिवर्तनीय वचन मानून तो ढिम्म राहू शकतो. पहिला मार्ग राष्ट्रीय पक्षाचा आहे, दुसरा मार्ग भूतकाळात जगण्याचा आहे.

सध्या भारत १९३७ मध्ये जगत नाही. तो फाळणीतून गेला आहे, संविधान बनवले आहे, युद्धे पाहिली आहेत, दहशतवादाचा सामना केला आहे, काश्मीरमधील कठीण दशक पाहिले आहे, ईशान्येतील बंडखोरी आणि शांतता प्रक्रियांचे विविध टप्पे पाहिले आहेत. त्याने चंद्रावर अंतरा-ळयान उतरवले आहे आणि डिजिटल युगात प्रवेश केला आहे. औपनिवेशिक काळातील सांप्रदायिक सौदेबाजीने भारताला अजूनही आपल्या राष्ट्रीय स्मृतींचा अर्थ निश्चित करण्यास सांगणे म्हणजे इतिहासाला वर्तमानावर राज्य करू देणे होय. एखाद्याच्या श्रद्धेचा आदर, स्वातंत्र्य आणि राष्ट्राच्या सांस्कृतिक स्मृतींचा आदर हे परस्पर-विरोधी नाहीत. राजकारणाचे काम त्यांच्यात पूल बांधणे आहे, कायमची दरी निर्माण करणे नाही.

दीडशे वर्षांनंतर 'वंदे मातरम' पुन्हा राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. हा योगायोग नसून भारतात होत असलेल्या खोल सांस्कृतिक बदलाचे ते द्योतक आहे. एक असा भारत निर्माण झाला आहे, जो आपली स्मृती पुसून आधुनिकता निर्माण करू इच्छित नाही. त्याला विज्ञान आणि संस्कृती हवी आहे, त्याला विकास आणि वारसा हवा आहे, त्याला संविधान आणि सभ्यतेचे आत्मभान हवे आहे, ज्या भूमीवर तिरंगा फडकतो त्या भूमीबद्दल त्याला तिरंगा आणि कृतज्ञता हवी आहे.

●●●

(पांचजन्यवरून साभार)

मंथन

डॉ. विवेक राजे/९८८१२४२२२४

सण हिंदूचे; पीक नॅरेटिव्हजचे

"कुंभ पर्वणीला संगमात स्नान ही प्रथा अकबराने सुरू केली म्हणून त्याला शाहीस्नान म्हणतात...''

''कुंभपर्वासाठी ३५ हजार कोटी रुपये खर्च करण्यावर माझा आक्षेप नाही, पण यातील १ टक्का रक्कम जरी खर्च केली असती, तर १००/१२५ सरकारी शाळा बंद पडण्यापासून वाचवता आल्या असत्या...''

''दिवाळीत फटाके उडवू नयेत,
त्याने फार प्रदूषण होते...
होळीला पाणी वाया जातं...
आधीच पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्याने
होळी वा रंग खेळूच नये...''

''मनुस्मृतीमुळे हिंदू स्त्री जाचक बंधनात...
रामायण, महाभारत हा इतिहास नव्हे...
श्रीराम हे काल्पनिक पात्र...''

असे अनेक नॅरेटिव्हज् हिंदू सण, उत्सव आले की हिंदूविरोधी साम्यवादी वोक इकोसिस्टमद्वारे पसरवण्यात येतात.

'भारत पुन्हा पुन्हा गुलाम झाला कारण आपण शत्रूसमोर वाकतो आणि प्रत्येक वेळी तडजोड करतो. आपण एवढे वाकत गेलो तर एक दिवस आपले अस्तित्वच नष्ट होईल,' असे एकदा डॉ. राम मनोहर लोहिया यांनी म्हटले होते. हिंदू समाज, हिंदू संस्कृती, हिंदू धर्म आणि हिंदू संस्था यांच्या बाबतीत पसरवण्यात येणारे हे नॅरेटिव्हज पाहिले की राम मनोहर लोहिया या आद्य समाजवादी विचारवंत नेत्याचे वाक्य आठवते. आजवर आम्ही अनेक आक्रमणांचा प्रतिकार केला. हजारो वर्षे ही आक्रमणे झेलूनही आमचे हिंदू म्हणून असलेले अस्तित्व, आम्ही या आक्रमणांना पुरून उरलो हेच दर्शविते. मात्र, आता आमच्या अस्तित्वाचे मूळ असलेल्या संस्कृतीवरच या नॅरेटिव्हजद्वारे हल्ला करण्यात आला आहे. त्याचा जोरदार विरोध केलाच पाहिजे आणि हे करताना यातील एकही नॅरेटिव्ह तर्काच्या, परिस्थितीच्या आणि हिंदू धर्मग्रंथांच्या आधारे टिकत नाहीत हे सगळ्या जगाला ठणकावून सांगितले पाहिजे. हिंदू समाजाच्या बाबतीत लोहियाजींचे वरील वाक्य खरे ठरते कारण आमची कितीही श्रद्धा असली तरी आम्ही आमच्यावर आक्रमण करणाऱ्यांवर प्रतिहल्ला न चढवता तडजोडी करीत राहतो.

उदाहरणार्थ, मनुस्मृतीमध्ये कुठे एक श्लोक आहे. लहान असताना पित्याने, विवाहपश्चात नवऱ्याने आणि उतारवयात मुलांनी स्त्रीचे रक्षण केले पाहिजे, अशा अर्थाचा. पण तोच श्लोक घेऊन हिंदू धर्माला मागील किमान दीडशे वर्ष बदनाम केले जाते. आता मनुस्मृती हा साधारणपणे दोन हजार वर्षांपूर्वी लिहिला गेलेला प्राचीन ग्रंथ आहे. दोन हजार वर्षांच्या या कालावधीत अनेक श्लोक, अनेक मुळात ग्रंथात नसलेल्या गोष्टी यात घुसविल्या गेल्या असण्याची बरीच मोठी शक्यता आहे. दुसरे म्हणजे, मनुस्मृती ही एका अत्यंत छोट्या आणि मर्यादित प्रादेशिक क्षेत्रात आणि काळात लागू असलेली तत्कालिन आचारसंहिता असावी तसेच आज तुम्ही जे काही मनुस्मृतीचा आधार घेऊन सांगत आहात, त्यापैकी हिंदू समाजात कोणत्याही गोष्टी, प्रथा आमच्या नजरेला येत नाहीत, हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. तसेच भूतकाळातील भारतात स्त्रियांच्या पारतंत्र्याचे किंवा बंधनांचे खरे कारण मनुस्मृती नसून, त्या काळातील अत्यंत असुरक्षित सामाजिक व राजकीय परिस्थिती होते. या सगळ्या परिस्थितीला कारण मध्ययुगीन कालखंडात देशावर झालेली परकीय आणि मुस्लिम आक्रमणे, त्यांनी केलेला विध्वंस, महिलांवर केलेले अत्याचार आणि त्यांना पळवून नेणे हे होते. यामुळे समाजात महिलांचा वावर अत्यंत असुरक्षित बनला होता, हे ठणकावून सांगितले पाहिजे. मनुस्मृतीत अनेक ठिकाणी असलेला स्त्री स्वातंत्र्याचा उल्लेख तर आधुनिक भारताच्या कायद्यांमध्ये देखील आढळत नाही, हे फार थोडे लोक जाणतात. उदाहरणार्थ, मनुने अध्याय ९ वा श्लोक ९० मध्ये ऋतुमती झालेल्या कन्येला असा सल्ला दिला आहे की, ऋतुमती झाल्यानंतर कुमारिकेने आपल्या लग्नाची व्यवस्था होण्याची तीन वर्षे वाट पाहावी. त्यानंतर मात्र, आपल्याला अनुरूप असा पती आपणच शोधून काढावा. हे मनुने स्त्रीला दिलेले स्वातंत्र्य आजच्या भारतातील न्याय व्यवस्थेत देखील नाही. पण याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले जाते. हिंदूंकरिता कोणत्याही अर्थाने महत्त्वाची नसलेल्या मनुस्मृतीतील मधलाच एखादा श्लोक घ्यायचा आणि हिंदू समाज, हिंदू धर्म, हिंदू संस्कृती यांना हाणत सुटायचे, हेच मागील दीडशे वर्षे सुरू आहे.

नाशिकचे कुंभ पर्व येत्या ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. साधारणपणे २१ महिन्यांच्या या कालावधीत कुंभ स्नानाचे ४२ पर्वणी मुहूर्त आहेत. या कुंभ पर्वाच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकार ३० हजार कोटी रुपये नाशिक, त्र्यंबकेश्वर या हिंदू तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी खर्च करणार आहे. या पर्वकाळात सुमारे १५ कोटी भाविक नाशिक, त्र्यंबकेश्वरला भेट देतील, असा प्राथमिक अंदाज आहे. या महोसवातून सरकारला केवळ कर रुपाने एक लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मिळण्याचा अंदाज आहे. म्हणजे या निमित्ताने तीर्थक्षेत्राचा विकास होऊन सरकारी गुंतवणुकीपेक्षा कितीतरी जास्त महसूल सरकारला सहजपणे प्राप्त होणार आहे. पण कुंभपर्व हिंदूंचा महोत्सव आहे. त्यामुळे मग कुणी लगेच नॅरेटिव्ह पसरवते. शे-दीडशे सरकारी शाळांची स्थिती कुंभ पर्वासाठी केल्या जाणाऱ्या खर्चाच्या १ टक्का खर्च करून सुधारता येईल, असे वक्तव्य केले जाते. कुणी संभाजीनगरचा माजी खासदार लगेच त्याची री ओढतो. हे वक्तव्य करताना पन्नास-साठ वर्षे हज यात्रेवर सबसिडीच्या रुपाने सरकारी खजिन्यातून केली जात असलेली खैरात त्याला दिसत नाही. सरकारी जमिनीवर सरकारी निधीतून उभारण्यात आलेली प्रचंड आकाराची, सर्व सुखसोयीयुक्त अशी हज हाऊसेस दिसत नाहीत.

याच प्रकारे एक अजून नॅरेटिव्हजचा व्हिडिओ सध्या सगळीकडे फिरत आहे. नाशिकचा कुणी एक विकृत तथाकथित पत्रकार एका व्हिडिओद्वारे हे नॅरेटिव्ह पसरवण्याचे काम करीत आहे. राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या आई-वडिलांना, त्यांनी आपल्या मुलाला शाळेत घातले म्हणून सवर्णांनी जाळून मारून टाकले, असे हा खोटारडा माणूस बरळतो आहे. वास्तविक खरगेंच्या आई-वडिलांना रझाकारांनी मारले, असे खुद्द मल्लिकार्जुन खरगे सांगतात. त्यांचे शालेय शिक्षण नूतन विद्यालय, गुलबर्गा या एका सवर्णाने स्थापन केलेल्या शाळेत झालेले आहे. याविषयीची सगळी माहिती इंटरनेटवर उपलब्ध आहे. पण हा हलकट आणि स्वतःला तथाकथित पत्रकार म्हणवणारा माणूस बेमुर्वतखोरपणे मुस्लिम रझाकारांनी मारले, ही वस्तुस्थिती झाकून ठेवून त्याऐवजी सवर्णांनी जाळून मारले, असे धडधडीत खोटे मांडत आहे. यांच्या मजबूत इको सिस्टिमच्या भरवशावर हे ठोकून दिले जाते. ही इको सिस्टिम मग कालांतराने हेच सगळे, खरा इतिहास म्हणून मांडते. मग याच्याच आधारे हिंदू समाजात फुट पाडण्याचे उद्योग साम्यवादींद्वारे केले जातात. दलितांच्या पुढे मडके आणि मागे झाडू बांधण्यात येत असे, हे तद्दन खोटे नॅरेटिव्ह, याविषयी कोणताही पुरावा नसताना हिंदू समाजातच रूढ करण्याचा साम्यवाद्यांचा प्रयत्न सर्वश्रुत आहेच.

हिंदूंचे सण आले की, काही उत्पादनांची विशिष्ट प्रकारे जाहिरात केली जाते. कधी दिवाळी या अस्सल हिंदू सणाचा उल्लेख दीपावली असा न करता 'फेस्टिवल ऑफ लाईट्स' अशाप्रकारे केला जातो. या हिंदू सणाच्या निमित्ताने लाखो-करोडोंचा व्यवसाय केला जातो. पण त्यांना हे सण, या प्रथा या हिंदू आहेत, त्यांची हिंदू नावे आहेत, हे जाहीर करायचे नसते. त्यातून ते हिंदू संस्कृतीवर आक्रमण करीत असतात. हिंदू संस्कृती, हिंदू धर्म, हिंदू समाज, हिंदू प्रथा-परंपरांचा अपमान करीत असतात. कुठे कधी एखादी जाहिरात, एखादी क्लिप, एखाद्या कवितेची ओळ, उगाच कुठे तरी घुसवलेली एखादी ओळ याद्वारे आमच्या मनाची विशिष्ट मशागत केली जाते. त्यामुळे आमची मानसिकता आमच्याच धर्म, संस्कृती, सण-वार, या गोष्टींचा आपलं म्हणून विचार करणे सोडून देते. मग आमच्या समाजात, संस्कृतीत कधीच नसलेल्या गोष्टी, संकल्पना कालांतराने आम्हाला आपल्या धर्मातील, संस्कृतीतील वाटू लागतात. आम्हाला आमच्याच पुर्वजांनी प्रयत्नपूर्वक, अभ्यासून निसर्ग सुसंगत असलेल्या प्रथा परंपरांची जी एक वीण घालून हिंदू संस्कृती जन्माला घातली, त्या संस्कृतीवर इतिहासाची, अब्राहमिक धर्मधार्जिणी मोडतोड करून नॅरेटिव्हजच्या आधारे होणाऱ्या या हल्ल्यांना आक्रमकतेने उत्तर देणे आवश्यक झाले आहे. हे उत्तर देताना आद्य समाजवादी राम मनोहर लोहिया यांच्या वक्तव्याची आठवणही ठेवलीच पाहिजे.

●●●

दहा वर्षांपासुन निवेदनांचा पाऊस; तरी इस्लापूरच्या जि.प.शाळेत शिक्षकांचा दुष्काळ!

तभा वृतसेवा
इस्लापूर, दि. ६ सप्टेंबर -

शासनाच्या कागदावर शिक्षणाच्या गुणवत्तेचे मोठमोठे दावे केले जात असले, तरी इस्लापूर येथील पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूलची परिस्थिती त्या दाव्यांना थेट छेद देणारी आहे. तब्बल ६५५ विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या या शाळेत १० पदे रिक्त आहेत. त्यात मुख्याध्यापकाचे पद आणि माध्यमिक शिक्षकांची पदेही रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. धक्कादायक बाब म्हणजे हा प्रश्न आजचा नसून २०१६ पासून शासन-प्रशासनाच्या दारात ठाण मांडून बसला आहे.

शाळेतील शिक्षकांची कमतरता दूर करण्यासाठी २०१६ पासून सातत्याने निवेदने, पत्रव्यवहार आणि पाठपुरावा करण्यात आला. ग्रामस्थ, पालक आणि संबंधितांकडून प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींचे दरवाजे ठोठावण्यात आले. मात्र, प्रत्येक वेळी आश्वासनांची पाने वाढत गेली; प्रत्यक्षात शिक्षकांची संख्या मात्र वाढली नाही.

२३ मे २०१९ रोजी तत्कालीन शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्याकडे शाळेतील शिक्षकांच्या प्रश्नासंदर्भात निवेदन देण्यात आले. त्यानंतर ३० जानेवारी २०२० रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पुन्हा निवेदन देण्यात आले. यासोबतच जिल्हाधिकारी, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख तसेच विविध लोकप्रतिनिधींकडेही वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला.

विशेष म्हणजे या प्रश्नासाठी करण्यात आलेल्या पत्रव्यवहारात माजी आमदार, विद्यम

ान आमदार, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद पदाधिकारी, शिक्षण विभागातील अधिकारी आणि केंद्रप्रमुख यांच्या पत्रांचा व पाठपुराव्याचा संदर्भ देण्यात आला आहे. म्हणजेच समस्या प्रशासनापासून लोकप्रतिनिधींपर्यंत सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. तरीही प्रश्न कायम असल्याने नेमके अडते कुठे? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

दरम्यान, १५ ऑगस्ट २०२६ रोजीच्या संचमान्यता अहवालाने शाळेतील वास्तव उघड केले आहे. शाळेत २९ पदे मंजूर असताना केवळ १९ पदांवर कर्मचारी कार्यरत असून १० पदे रिक्त आहेत. एवढ्या मोठ्या विद्यार्थीसंख्येच्या शाळेत जवळपास एकतृतीयांश पदे रिक्त असणे ही गंभीर बाब आहे.

शाळेत ३२४ मुले आणि ३३१ मुली मिळून ६५५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इयत्ता १ ते ५ मध्ये २७७, इयत्ता ६ ते ८ मध्ये २४८, तर इयत्ता ९ ते १० मध्ये १३० विद्यार्थी आहेत. विशेषतः माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने शिक्षकांची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची असताना याच स्तरावरील पदे रिक्त असल्याने पालकांची चिंता वाढली आहे.

२ सप्टेंबर २०२६ रोजी मंत्री दादाजी भुसे यांच्याकडेही पुन्हा निवेदन देण्यात आले आहे. मागील अनेक वर्षांच्या पत्रव्यवहाराचा दाखला देत शाळेतील रिक्त पदे तातडीने भरावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

२०१६ पासून प्रश्न मांडला जात आहे. २०१९ मध्ये तत्कालीन शिक्षणमंत्र्यांकडे निवेदन गेले. २०२० मध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे धाव घेण्यात आली. त्यानंतरही अधिकारी आणि लोकप्रतिनिधींकडे सातत्याने पाठपुरावा झाला. २०२६ मध्येही पुन्हा निवेदन द्यावे लागत असेल, तर मागील दहा वर्षांत प्रशासनाने नेमके केले तरी काय? असा संतप्त सवाल पालक व ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

पीएमश्री शाळेचा दर्जा मिळतो, योजना येतात, घोषणा होतात; पण वर्गात शिकविण्यासाठी शिक्षकच नसतील तर या सगळ्याचा उपयोग काय? असा सवालही उपस्थित होत आहे.

आता निवेदनांच्या फेऱ्या आणि आश्वासनांचा खेळ थांबवून रिक्त पदांवर तातडीने शिक्षकांची नियुक्ती करावी, अशी मागणी जोर धरत आहे. कारण हा प्रश्न केवळ शाळेतील रिक्त पदांचा नसून ६५५ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा आहे. दहा वर्षे पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसेल, तर जबाबदारी कोणाची? इस्लापूरच्या पालकांचा हा सवाल आता प्रशासनाला उत्तर मागत आहे.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ : माजी सरपंच प्रभाकर बैनवाड

२०१६ पासून शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न प्रशासनाच्या दारात आहे. पण आजपर्यंत या प्रश्नाला कायमस्वरूपी तोडगा मिळालेला नाही. एक-दोन नव्हे, तर वर्षानुवर्षे निवेदने, पत्रव्यवहार आणि पाठपुरावा करूनही जर ६५५ विद्यार्थ्यांसाठी शिक्षक उपलब्ध होत नसतील, तर ही केवळ प्रशासकीय दिरंगाई नसून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ आहे. २९ पदे मंजूर असताना १० पदे रिक्त ठेवणे आणि मुख्याध्यापकाचे पदही न भरणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या घोषणा कागदावरच राहणार असतील, तर त्याचा उपयोग काय? आता आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष नियुक्तीची गरज आहे. संबंधित विभागाने तातडीने रिक्त पदे भरावीत; अन्यथा पालक, ग्राम स्थ आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारल्याशिवाय पर्याय राहणार नसल्याचा इशारा माजी सरपंच प्रभाकर बैनवाड यांनी दिला.

जिजाऊ माँ साहेब सोसायटी लि.ची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा

तभा वृतसेवा
नांदेड, दि. ६ सप्टेंबर -

जिजाऊ माँ साहेब महिला अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.नांदेड ची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा ताज पाटील हॉटेल नांदेड येथे संस्थेच्या अध्यक्षा सौ.प्रणिता देवरे-चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली तर आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनात पार पडली.

या सभेत संस्थेचा पहिल्या वर्षाचा वार्षिक अहवाल,जमा-खर्च ताळेबंद,नफा-तोटा पत्रक सर्वानुमते मंजूर करण्यात आले. पहिल्याच वर्षात संस्थेने उल्लेखनीय प्रगती करून महिला सभासदांचा विश्वास संपादन केल्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब म्हणाले की,महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याशिवाय कुटुंब आणि समाजाची प्रगती होणार नाही. जिजाऊ माँ साहेब क्रेडिट सोसायटीच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबनाची मोठी संधी मिळाली आहे.संस्थेने पारदर्शक व प्रामाणिक कारभार ठेवल्यास महाराष्ट्रात एक आदर्श संस्था म्हणून नावारूपाला येईल.

याप्रसंगी बँकेच्या अध्यक्षा सौ.प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की,जिजाऊ माँ साहेबांच्या विचारांना समोर ठेवून महिलांच्या सक्षमीकरणासाठी या संस्थेची स्थापना केली आहे.बचत गटातील महिलांना कमी व्याजदरात कर्ज,बचतीला प्रोत्साहन आणि व्यवसाय मार्गदर्शन देणे हा आमचा उद्देश आहे.बचत घराची,प्रगती महिलेची आणि समृद्धी कुटुंबाची याच ध्येयाने प्रत्येक महिलेने स्वतःच्या पायावर उभं राहावं,हा आमचा संकल्प आहे.कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

या सभेला प्रमुख पाहुणे म्हणून युवक प्रदेश सरचिटणीस राहुल हंबर्डे,राष्ट्रवादी शहर कार्याध्यक्ष माधव पावडे,सोपानराव क्षीरसागर,मा.पं.स.सभापती आनंदराव शिंदे,उपनगराध्यक्ष करीम शेख,मा. जि.प.सदस्य गणेशराव सावळे,राष्ट्रवादी प्रदेश सदस्य मोहसीन शेख,जिल्हा सहकार विकास अधिकारी एस. एन.लुटे,अनिल बोरगावकर,महादेवी मठपती यांच्यासह बँकेच्या उपाध्यक्ष मीनाक्षी मोरे, संजीवनीताई गाडे शोभाताई शिंदे माजी जिल्हा परिषद सदस्य, अर्चनाताई मोरे अश्विनीताई जोगदंड, सविता ताई गायकवाड,शाखा व्यवस्थापक चंद्रशेखर शिंदे,सर्व संचालक,संचालिका,महिला सभासद व महिला बचत गटाच्या प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सावंत अॅक्वा सेंटरचे उत्साहात शुभारंभ; उद्योजकांची उपस्थिती

नवीन नांदेड -पद्मजा सिटी लगत असलेल्या शंकर नगरी येथील रहिवासी पत्रकार तथा व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम सावंत आणि योगेश आडबे यांच्या मालकीचे शुद्ध पिण्याचे पाणी सावंत अॅक्वा सेंटरचे उद्घाटन दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते दिनांक ३ सप्टेंबर रोजी करण्यात आले. शंकर नगरी येथे शुद्ध पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेऊन येतील रहिवासी तुकाराम सावंत व योगेश आडबे यांनी येथील वसाहतीतील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळण्यासाठी त्यांनी दिनांक ३ सप्टेंबर रोजी दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते सावंत अक्का सेंटरचे उद्घाटन करून येथील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून अॅक्वा सेंटरची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रसिद्ध उद्योगपती तथा पद्मजा सिटीचे संचालक बालाजी जाधव, बोधले ज्वेलर्सचे मालक सुधाकर बोधले, नगरसेवक राजू काळे, संजय पाटील घोगरे, सतीश बसवदे, वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य शेखर घुंगरवार, उदयकुमार पातावार, मनोज कोटलवार ,तलाठी मोतीराम पवार, वैजनाथ लुटे, नागोराव ढवळे, नागेश पुट्टा, पत्रकार लखपत्रेवार, शार्दुल कोमवाड, गोविंदराव मुंडे यांच्यासह शंकर नगरी येथील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाई जि.प.प्रा.शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी गोविंद पा.शिंदे

मुदखेड -मुदखेड तालुक्यातील वाई येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची निवड आज शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी पालकांच्या गुप्त मतदानातून लोकशाही पद्धतीने पार पडली. नूतन अध्यक्षपदी गोविंद बालाजी शिंदे यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्ष व इतर सदस्यांचीही निवड करण्यात आली. शालेय व्यवस्थापन समितीच्या पुनर्गठनाची संपूर्ण प्रक्रिया शासनाच्या निर्धारित नियमानुसार पार पाडण्यात आली. ही प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक ए. एस. वजिरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक एस. एन. सुजलेगावकर, एच. एम. सय्यद व ए. यू. मुंडे यांनी परिश्रम घेतले. विशेष म्हणजे, शालेय व्यवस्थापन समितीची निवडणूक गुप्त मतदानाच्या लोकशाही पद्धतीने घेण्यात आल्याचा हा मुदखेड तालुक्यातील वाई येथे पहिलाच प्रयोग असल्याचे सांगण्यात येत आहे. यावेळी सरपंच प्रतिनिधी बालाजी पेंटेवाड, उपसरपंच केशव पाटील ढगे, तंटामुक्ती अध्यक्ष दिलीप पाटील तिडके, चेअरमन रामराव इंजेवाड, मोहनराव पाटील पवार, माजी अध्यक्ष भगवानराव हानवते, दिलीप डोंगरे, मनोज चेमलवाड, शिवाजीराव वडजे, हनुमंत तिडके, सचिन सोनकांबळे, व समस्त गावकरी मंडळी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

आर्य समाजातर्फे ९ ते ११ सप्टेंबरदरम्यान श्रावणी वेदप्रचार महोत्सव

नांदेड -आर्य समाज नांदेडच्या वतीने श्रावणी वेदप्रचार मासानिमित्त तीन दिवसीय श्रावणी वेदप्रचार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ९ ते ११ सप्टेंबर २०२६ दरम्यान जुना मोंढा परिसरातील आर्य समाज मंदिरात होणार आहे. महोत्सवात यज्ञ, वैदिक प्रवचने, ज्ञानयज्ञ, महिला संमेलन तसेच शंका-समाधान अशा विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवासाठी गाजियाबाद (उत्तर प्रदेश) येथील वैदिक विद्वान व व्याख्याते पं. बृजेश शास्त्री हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच एटा (उत्तर प्रदेश) येथील भजनोपदेशक पं. शिवपाल आर्य हे भजन व उपदेशाच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. महोत्सवाच्या कालावधीत दररोज सकाळी ८ ते १० आणि सायंकाळी ६ ते ८ या वेळेत ज्ञानयज्ञ, व्याख्याने व प्रवचनांचे आयोजन करण्यात आले आहे. या वैदिक ज्ञान व प्रबोधनाच्या पर्वात नागरिकांनी सहकुटुंब सहभागी होऊन महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आर्य समाज नांदेडच्या अध्यक्षा श्रीमती जी. व्ही. मारमपल्ले, मंत्री ड. ओम ऋतुध्वज कदम, कोषाध्यक्ष यादव भांगे, उपप्रधान अभय कुलकर्णी, उपमंत्री धोंडीबा सुरावार, व्यवस्थापक गजानन डोके यांच्यासह सर्व मार्गदर्शक व सदस्यांनी केले आहे.

लक्ष्मण गणगोपले यांचे निधन

तभा वृतसेवा
नांदेड, दि. ६ सप्टेंबर -

बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील रहिवासी लक्ष्मण गंगाधर गणगोपले (वय ४५) यांचे रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता निधन झाले.

स्व. लक्ष्मण गणगोपले हे मनमिळाऊ, प्रेमळ स्वभावाचे आणि सर्वांशी आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. गावातील तसेच परिसरातील अनेकांच्या सुख-दुःखात ते नेहमी सहभागी होत. त्यांच्या अकाली निधनाने कुंडलवाडी तसेच परिसरात हळहळ व्यक्त होत असून शोककळा पसरली आहे.

त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता कुंडलवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, आई-वडील, दोन मुले, सून, असा मोठा परिवार आहे.

ते ओड समाजाचे सचिव नंदकिशोर टोकलवाड नरसीकर यांचे मेहुणे होत.

शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन स्वतःची प्रगती साधावी, हीच शिक्षकांना दिलेली खरी गुरुदक्षिणा : अॅड. येरेकार

तभा वृतसेवा
षर्वीत, दि. ६ सप्टेंबर -

विद्यार्थिनींनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन स्वतःची प्रगती साधावी, हीच शिक्षकांना दिलेली खरी गुरुदक्षिणा आहे, असे प्रतिपादन अॅड. सुनिल येरेकार यांनी केले.

राजकुंवर महिला म हाविद्यालय, किनवट येथे शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयात निबंध स्पर्धा व भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या विचारांची प्रभावी मांडणी केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा. गायकवाड ए. पी. होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी विद्यार्थिनींना

शिक्षणाचे महत्त्व पटवून देत ज्ञान, शिस्त आणि परिश्रम यांच्या बळावर यश संपादन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात विश्वजित भवरे यांनी सादर केलेल्या कवितेने उपस्थितांची मने जिंकली. तसेच विद्यार्थिनींनी शिक्षकांचे समाजातील योगदान, शिक्षणाचे महत्त्व आणि आदर्श शिक्षक या विषयांवर उत्कृष्ट भाषणे सादर केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गिरभिडे डी. बी. यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. कुलकर्णी डी. के., प्रा.पाटील एन.पी. प्रा.औदीवार के.व्ही, प्रा. कनाके एस. जी., प्रा. गावत्रे पी. टी., प्रा. मोरे डी. पी., प्रा. राजपूत ए. आर., प्रा. अन्नेलवार ए. आर., प्रा. सोनुळे पी. जी. तसेच श्रीमती जाधव के. व्ही. यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. शेवटी प्रा. कुलकर्णी डी.के.यांनी उपस्थितांचे आभार मानले.

विद्यापीठाच्या ध्वजातील निळा रंग हटविला!

तभा वृतसेवा
नांदेड, दि. ६ सप्टेंबर -

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ध्वजातून निळा रंग हटविल्याच्या जातीयवादी प्रकाराविरोधात मागील दोन-अडीच वर्षांपासून सातत्याने लढा देणारे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ तलवारे यांनी, विद्यापीठ ध्वजातील निळा रंग पूर्ववत करावा या मागणीसाठी येत्या दि. १५ सप्टेंबरपासून विद्यापीठासमोर आपल्या सहकाऱ्यांसमवेत बेमुदत आमरण उपोषण व भजन आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ध्वजात एकूण चार रंग होते. त्यामध्ये चार पट्ट्यांतील दुसरा पट्टा हा निळ्या रंगाचा होता. विद्यापीठाच्या ध्वजात निळ्या रंगाचा समावेश का करण्यात आला याचे विश्लेषण विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू तथा येथील विचारवंत दिवंगत डॉ. जनार्दन वाघमारे यांनी त्यांच्या 'चिंतन कुलगुरूचे' या पुस्तकात केले आहे. निळा रंग हा विशालतेचे व भव्यतेचे प्रतीक आहे, असे या पुस्तकात नमूद करीत असतानाच शीख धर्मीय व दलित समाजाची निळ्या रंगावरील असलेली श्रद्धा डॉ. वाघमारे यांनी आपल्या पुस्तकातून अधोरेखित केली आहे.

विद्यापीठाच्या सिनेट व व्यवस्थापन समितीचा ठराव घेऊन हा ध्वज विविध रंगांचा बनविला होता. तो ठरावच आज विद्यापीठ प्रशासनाकडे सापडतच नाही, हा एक आणखीनच आश्चर्यकारक प्रकार आहे.

विद्यापीठाच्या तत्कालीन कुलगुरू/कुलसचिव यांनी व्यवस्थापन परिषदेचा ठराव न घेता, विद्यापीठाच्या कुठल्याही अधिनियमांत महामहीम राज्यपाल तथा कुलपती यांची परवानगी न घेता विद्यापीठाच्या ध्वजातील निळा रंग हटविला. या विरोधात येथील सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ तलवारे गेल्या दोन-अडीज वर्षांपासून आवाज उठवत आहेत. विद्यापीठ प्रशासनाकडे सातत्याने पत्रव्यवहार करीत आहेत. विद्यापीठाने ध्वज बदलाबाबत दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी चार सदस्यीय समिती स्थापन केली.परंतु वर्ष संपत आले तरी देखील समितीचा अहवाल आढावा घेतला नाही किंवा निर्णय झाला नाही.

ध्वजातील निळा रंग हटविणे ही बाब अत्यंत निंदनीय व निषेधार्ह आहे. विद्यापीठ प्रशासन हे जातीयवादी मानसिकतेतुन आपली मनमानी करू पाहत आहे. याच्या निषेधार्थ व ध्वजातील निळा रंग पूर्ववत करावा या मागणीसाठी सिद्धार्थ तलवारे हे येत्या १५ सप्टेंबरपासून विद्यापीठासमोर आपल्या सहकार्यांसमवेत बेमुदत आमरण उपोषण व भजन आंदोलन करणार आहेत.

निळ्या रंगावर श्रद्धा असणाऱ्या विद्यार्थी व सुजाण नागरिकांनी या आंदोलनस्थळी मोठ्या प्रमाणात आपला सहभाग नोंदवावा,असे आवाहन सिद्धार्थ तलवारे यांनी केले आहे.

पावसाअभावी पिके कोमेजली ; तालुक्यातील शेतकरी चिंतेत

तभा वृतसेवा
मुदखेड, दि. ६ सप्टेंबर -

मुदखेड तालुक्यात यावर्षी अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने शेतकरी मोठ्या चिंतेत सापडला आहे. निसर्गाने साथ न दिल्याने अनेक भागांतील उभी पिके पाण्याअभावी कोमेजू लागली असून, पुढील काही दिवसांत चांगला पाऊस न झाल्यास पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून खरीप हंगामातील पेरणी केली आहे. बियाणे, खते, औषधे, मशागत व मजुरीसाठी मोठी रक्कम खर्च करण्यात आली आहे. मात्र, पावसाने पाठ फिरवल्याने शेतातील ओलावा कमी होत असून पिकांची वाढ खुंटत आहे. हिरवीगार दिसणारी पिके आता

पाण्याअभावी कोमेजू लागल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे.

शेतीवरच ग्रामीण कुटुंबांचे संपूर्ण आर्थिक गणित अवलंबून असते. पिकांचे उत्पादन चांगले आले तरच घरखर्च, मुलांचे शिक्षण, कर्जाचे हप्ते आणि पुढील हंगामाचा खर्च भागविता येतो. मात्र, यावर्षी पिके हातातून जाण्याची शक्यता निर्माण झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडण्याची भीती व्यक्त करीत आहेत.

आगामी बैलपोळा व इतर सण-उत्सव कसे साजरे करायचे? असा प्रश्नही शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. शेतातील पिकांची परिस्थिती पाहून अनेक शेतकरी सध्या आकाशाकडे डोळे लावून पावसाची प्रतीक्षा करीत आहेत.

या परिस्थितीत तालुक्यातील लोकप्रतिनिधी व प्रशासनाने शेतकऱ्यांच्या अडचणींकडे गांभीर्याने लक्ष देऊन परिस्थितीची पाहणी करावी आणि आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्ष संकटाच्या वेळी शेतकऱ्यांना मदत मिळणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

वेळेत समाधानकारक पाऊस झाला तरच उभ्या पिकांना जीवदान मिळू शकते. त्यामुळे सध्या मुदखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष केवळ आकाशाकडे लागले असून, पावसाची प्रतीक्षा अधिकच तीव्र झाली आहे.

श्रीक्षेत्र उमरज देवस्थानास पंचवीस लक्ष रुपयाचा निधी : आ. चिखलीकर

तभा वृतसेवा
कंधार, दि. ६ सप्टेंबर -

श्रीक्षेत्र उमरज (धाकटे पंढरपूर) मठ संस्थानात सौरऊर्जा दिवे बसविण्यात साठी २५ लक्ष रुपयाचा निधी कंधार लोहा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी जाहीर केला ते दिनांक ५ सप्टेंबर रोजी श्रीक्षेत्र उमरज येथे श्रीकृष्ण जन्मोत्सव व संस्थानचे पहिले मठाधिपती श्री संत नामदेव महाराज जन्मोत्सवानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता प्रसंगी ते बोलत होते पुढे बोलताना आमदार चिखलीकर असे

म्हणाले कि श्रीक्षेत्र उमरज मठ संस्थांवर आमच्या परीवाराची -पिढ्यापासूनची श्रद्धा असून आज पर्यंत माझ्या हातून अनेक कामांच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाचा विकास निधी उपलब्ध करून देण्याचे मला भाग्य लाभलेले आहे . येथून पुढील काळामध्ये ही जो काही विकास निधी ची संस्थानास आवश्यकता आहे तो विकास निधी देण्यासाठी मी वचनबद्ध असून या देवस्थानास होत असलेले अनेक धार्मिक कार्यक्रम लक्षात घेता २५ लक्ष रुपया चे सौर ऊर्जा दिवे बसण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आमदार चिखलीकर यांनी हजारो भावी भक्तांसमोर जाहीर केले.

दिनांक २९ ऑगस्ट २०२६ पासून सुरू असलेल्या या सोहळ्यात विविध धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

आज दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी मठाधिपती ह.भ.प. एकनाथ गुरु नामदेव महाराज यांच्या काल्याच्या कीर्तन व महाप्रसादाने हजारो भाविक-भक्तांच्या उपस्थितीत या सोहळ्याची सांगता झाली.

यावेळी कंधार नगर पालिकेचे उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, बाबुराव केंद्रे, स्वप्निल पाटील लुंगारे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष मनोहरराव पाटील भोसीकर, संजय भोसीकर, , नगरसेवक महेश पिनाटे, चेतन केंद्रे, असिफ शेख, माजी नगरसेवक सुनील कांबळे, शासकीय कंत्राटदार सूर्यकांतराव गुट्टे, प्रदीप शिंदे, माळाकोळी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजकुमार हिंगोले बीट जमदार बोंबले , निलेश गौर, मधुकर पाटील डांगे, विनोद पाटील तोरणे, नवनाथ पाटील तोरणे, विश्वांभर भुते, राजेश भुते, तिरुपती भुते, काशिराम तोरणे, लक्ष्मण भुते बालाजी तोरणे एकनाथ तोरणे, हरी केंद्रे यांच्यासह गावातील नागरिकांसह पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.